रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक १९९
www.ramprahar.com

मंगळवार, ४ फेब्रुवारी २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## राजधानी दिल्लीतील प्रचाराच्या तोफा थंडावल्या!

**नवी दिल्ली :** येथील विधानसभा निवडणुकीचा जाहीर प्रचार सोमवारी (दि. ३) सायंकाळी ६ वाजता थांबला. या केंद्रशासित प्रदेशात ५ फेब्रुवारीला मतदान आणि ८ फेब्रुवारी रोजी निकाल जाहीर होईल. निवडणूक प्रचाराच्या अखेरच्या दिवशी राजकीय पक्षांच्या काही मोठ्या नेत्यांनी जनतेशी संपर्क साधला. दरम्यान, निवडणूक आयोगाने ५ फेब्रुवारी रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ६.३० वाजेपर्यंत एक्झिट पोलवर निर्बंध घातले आहेत. या संदर्भात दिल्लीच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने एक आदेशदेखील जारी केला आहे. दिल्लीत मतदानासाठी १३ हजार ७६६ केंद्र तयार करण्यात आली आहेत. एकूण ८३.७६ लाख पुरुष, ७२.३६ लाख महिला आणि १२६७ तृतीयपंथी मतदार आहेत. मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी पोलिसांनीही तयारी केली आहे.

अंतरंग

'महिलांसाठी तालुकास्तरावर अस्मिता भवन उभारावे'/२
मंत्री गणेश नाईक यांचा जनता दरबार/६
तायक्वांडो असोसिएशनतर्फे खेळाडूंचा गौरव/८

# कामोठ्यात आमदार आपल्या दारी!

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपक्रमाला नागरिकांचा प्रतिसाद

**कामोठे : रामप्रहर वृत्त**




कामोठे वसाहतीत आमदार प्रशांत ठाकूर यांच्या संकल्पनेनुसार आमदार आपल्या दारी हा उपक्रम रविवारी (दि. २) झाला. या उपक्रमाचे नागरिकांनी स्वागत करीत समाधान व्यक्त केले. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी कामोठे परिसरातील नागरिकांच्या समस्या जाणून घेत त्यांचे निराकरण करण्याची ग्वाही दिली.

पनवेल महापालिका आणि शासनाशी संबंधित असलेल्या विविध समस्या जाणून त्यांचे निराकरण करण्यासाठी आमदार आपल्या दारी उपक्रम राबविण्यात येत आहे. त्यानुसार कामोठे परिसरातील नागरिकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी तेथील सुषमा पाटील विद्यालयात हा उपक्रम झाला. या वेळी नागरिकांनी सुरक्षा, आयुष्मान क्लिनिक, पाणीटंचाई, प्रदूषण, ग्राउंड, भाजी मार्केट, गार्डन, विरंगुळा केंद्र, स्पीडब्रेकर, पाणीपुरवठा, अग्निशमन दल, पेट्रोल पंप, मालमत्ता करासंदर्भात शास्ती माफी, लाईट, रेल्वे स्टेशन परिसरात अनधिकृत फेरीवाल्यांचा प्रश्न, अनधिकृत गॅरेज, टॉयलेट, विरंगुळा केंद्र, वाचनालय, स्मशानभूमी, जिमखाना, मंदिरे अधिकृत करण्यासंदर्भातील विषय, पार्किंग यासह विविध विषय मांडले. या प्रश्नांची उत्तरे देत लवकरात लवकर या सर्व समस्या सोडवण्यासाठी पाठपुरावा करणार असून प्रत्येक तीन महिन्यांनंतर या प्रश्नांचा पुन्हा एकदा आढावा घेणार असल्याचे आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले तसेच प्रत्येक महिन्यात एका शहरात आमदार आपल्या दारी हा उपक्रम राबवण्यात येणार आहे. नागरिकांनी ज्या समस्या, तक्रारी सूचना मांडल्या आहेत त्यांना १० ते १५ दिवसांत लेखी उत्तर देणार असल्याचे सांगितले. (पान २ वर..)

# पनवेल विधानसभा क्षेत्रात नमो चषक भव्य क्रीडा महोत्सव

### खारघरमध्ये क्रिकेट, कळंबोलीत कुस्ती, तर कामोठ्यात व्हॉलीबॉल, रस्सीखेच, फुटबॉल स्पर्धा रंगणार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उदयोन्मुख खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी भारतीय जनता युवा मोर्चा पनवेलतर्फे येथील विधानसभा मतदारसंघात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली ६ ते ९ फेब्रुवारीपर्यंत भव्य क्रीडा महोत्सव अर्थात नमो चषक २०२५चे आयोजन करण्यात आले आहे.

नमो चषक अंतर्गत ६ ते ९ फेब्रुवारीपर्यंत खारघर सेक्टर १४ येथील जय हनुमान चेरोबा बापदेव मैदानावर भव्य क्रिकेट स्पर्धा, कामोठे सेक्टर ६ येथील लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या मैदानावर ७ फेब्रुवारीला व्हॉलीबॉल स्पर्धा, ८ फेब्रुवारी रोजी रस्सीखेच, ९ फेब्रुवारीला फुटबॉल स्पर्धा होणार आहे, तर कळंबोली सेक्टर १६ येथे ९ फेब्रुवारी रोजी भव्य कुस्ती स्पर्धा रंगणार आहे.

खारघर येथे भव्य टेनिस क्रिकेट सामने दिवस रात्र अशा स्वरूपात होणार असून या स्पर्धेतील विजेत्या संघास एक लाख ११ हजार १११ रुपये, उपविजेत्यास ५५ हजार ५५५ रुपये, तृतीय क्रमांकाच्या संघास ३३ हजार ३३३ रुपये तसेच मॅन ऑफ दि सिरीजला मोटरसायकल आणि दररोज लकी ड्रॉ अशी भरघोस पारितोषिके आहेत.

कामोठे येथे होणाऱ्या व्हॉलीबॉल स्पर्धेतील विजेत्या संघाला १५ हजार रुपये व चषक, द्वितीय क्रमांकास १० हजार रुपये व चषक, तृतीय क्रमांकास पाच हजार रुपये व चषक; फुटबॉल स्पर्धेतील विजेत्या संघास २० हजार रुपये, द्वितीय क्रमांकास १० हजार रुपये, तृतीय क्रमांकाला पाच हजार रुपये आणि सर्व विजेत्या संघांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

रस्सीखेच स्पर्धा पुरुष व महिला अशा गटात होणार आहे. यामध्ये पुरुष गटातील प्रथम पारितोषिक सात हजार रुपये व चषक, द्वितीय पारितोषिक पाच हजार रुपये व चषक, तृतीय पारितोषिक तीन हजार रुपये व चषक, महिला गटातील प्रथम पारितोषिक सात हजार रुपये व चषक, द्वितीय पारितोषिक पाच हजार रुपये व चषक, तृतीय पारितोषिक तीन हजार रुपये व चषक तसेच प्रत्येक फेरीतील विजेत्या संघाला रोख एक हजार रुपये असे बक्षिसांचे स्वरूप आहे.

कळंबोली येथे ९ फेब्रुवारीला होणाऱ्या भव्य कुस्ती स्पर्धेत रुस्तम-ए-हिंद पैलवार सिकंदर शेख (सोलापूर) विरुद्ध रुस्तम-ए-हिंद पैलवान लाली गुरुदास पोल (पंजाब) यांचा खास आकर्षण सामना होणार असून यामधील विजेत्या पैलवानास पाच लाख रुपये व मानाची गदा, तर महिलांच्या गटात महाराष्ट्र चॅम्पियन पैलवान अमेघा घरत (पनवेल) विरुद्ध महाराष्ट्र चॅम्पियन पैलवान अंकिता फातले (कोल्हापूर) यांचा खास आकर्षण सामना होणार असून विजेत्या पैलवानाला ५१ हजार रुपये व मानाची गदा देऊन गौरविण्यात येणार आहे.

पुरुषांच्या गटात महाराष्ट्र चॅम्पियन पै. निखिल कदम विरुद्ध महाराष्ट्र चॅम्पियन पै. अनिल कचरे, पै. शुभम वळखडे विरुद्ध पै. आकाश दुबे, पै. श्रेयश कचरे विरुद्ध पै. सुशांत देवमाने, पै. साजन पावशे विरुद्ध पै. निलेश कदम आणि पै. समाधान घनपट विरुद्ध विजय घुले यांच्या सामना रंगणार आहे. महिला गटात पै. स्नेहा येवले विरुद्ध वैष्णवी यादव आणि पै. रितिका कारंडे विरुद्ध गौरी जाधव यांचा विशेष सामना होणार आहे. (पान २ वर..)

## जहाल नक्षलवाद्यासह चौघांचे आत्मसमर्पण




**गडचिरोली : प्रतिनिधी**

तब्बल २८ लाख रुपये बक्षीस असलेल्या एक वरिष्ठ कॅडरच्या नक्षलवाद्यासह एक एरिया कमिटी मेंबर आणि दोन सदस्यांनी गडचिरोली पोलीस आणि सीआरपीएफ दलासमोर आत्मसमर्पण केले. अशोक सडमेक उर्फ चंद्रशेखर, वनिता झोरे, साधू मोहंदा आणि मुन्नी कोरसा असे शरण आलेल्या नक्षलवाद्यांची नावे आहेत.

अशोक हा नक्षल चळवळीतील वरिष्ठ नेता असून वनिता टेक्निकल टीमची सदस्य, तर साधू आणि मुन्नी या सदस्य आहेत. अशोकवर ८२ गुन्हे दाखल असून त्यामध्ये ३१ चकमक १७ जाळपोळ आणि ३४ इतर गुन्ह्यांचा समावेश आहे. त्याच्यावर शासनाने १६ लाखांचे बक्षीस ठेवले होते. वनिता हिच्यावर ११ गुन्हे दाखल असून त्यामध्ये एक चकमक, दोन जाळपोळ आठ इतर गुन्ह्यांचा समावेश आहे. तिच्यावर सहा लाख रुपयांचे बक्षीस होते.

साधूवर चार गुन्हे दाखल असून त्याच्यावर चार लाखांचे, तर मुन्नीवर दोन लाखांचे बक्षीस होते. नक्षलवाद्यांच्या टीसीओसी या चार महिन्यांच्या कालावधीमध्ये चार नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केल्याने नक्षल चळवळीला मोठा हादरा बसल्याचे बोलले जात आहे. याच कालावधीत नक्षल चळवळ आक्रमक होत असते, पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गडचिरोलीच्या पालकमंत्रिपदाची सूत्रे हाती घेतल्यापासून चित्र बदलल्याचे दिसून येत आहे.

## दुहेरी हत्याकांडाने शिर्डीत खळबळ

**शिर्डी :** येथे सोमवारी (दि. ३) पहाटे तासाभराच्या अंतरात झालेल्या तीन वेगवेगळ्या हल्ल्यांमध्ये दोघांचा मृत्यू झाला असून एक जण गंभीर जखमी झाला आहे. या प्रकरणी एका आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

साईबाबा संस्थानमध्ये नोकरीवर असणारे सुभाष घोडे ड्युटीवर जात असताना कर्डोबा नगर चौक येथे, तर नितीन शेजुळ हा कंत्राटी सुरक्षा रक्षक ड्युटी संपवून घरी जात असताना साकुरी शिव या ठिकाणी हल्ला झाला. यामध्ये दोघांचाही मृत्यू झाला. तिसऱ्या घटनेत कृष्णा देहरकर यांच्यावर श्रीकृष्ण नगर भागात जीवघेणा हल्ला झाला. त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. या हल्ल्यांचा अधिक तपास सुरू आहे.

## निवडक

### मुंबईत ट्रेनमध्ये महिलेवर बलात्कार; आरोपीला अटक

**मुंबई :** वांद्रे टर्मिनस या ठिकाणी एका महिलेवर बलात्कार झाल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी हमालाला अटक केली आहे. पीडित ५५ वर्षीय महिला हरिद्वारहून ट्रेनने मुंबईत आली. या महिलेबरोबर आलेला नातलग कामानिमित्त बाहेर गेला. या वेळी महिलेला डुलकी आल्याने ती रिकाम्या ट्रेनमध्ये झोपली होती. एका हमालाने तिच्यावर बलात्कार केला. त्याला अटक झाली आहे.

### राष्ट्रपती भवनात प्रथमच होणार विवाह सोहळा

**नवी दिल्ली :** राष्ट्रपती भवनात प्रथमच एका लग्न सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या (सीआरपीएफ) अधिकारी पूनम गुप्ता यांच्या विवाहास राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांनी परवानगी दिली आहे. गुप्ता या राष्ट्रपती भवनात कार्यरत असून त्या राष्ट्रपतींच्या खासगी सुरक्षा अधिकारी आहेत. त्यांचा लग्न सोहळा १२ फेब्रुवारी रोजी होणार असल्याचे वृत्त आहे.

## प्रधानमंत्री आवास योजनेतील घरकुलांच्या कामांना गती द्या : मुख्यमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**



प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा दोनमध्ये प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्रासाठी १९ लाख ६६ हजार घरकुलांचे उद्दिष्ट ठेवले आहे. आतापर्यंत १६ लाख ८१ हजार ५३१ घरकुलांना मंजुरी देण्यात आली आहे. सामाजिक उत्तरदायित्व निधीची मदत घेऊन कामांना गती देण्याचे व घरकुलांचे उद्दिष्ट पूर्ण करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सोमवारी (दि. ३) केंद्र व राज्य शासनाच्या सामाजिक क्षेत्रातील फ्लॅगशिप योजनांचा वॉररूममध्ये आढावा घेऊन या योजनांना गती देण्याचे निर्देश दिले. यामध्ये आरोग्य, गृहनिर्माण व पाणीपुरवठा विभागाच्या योजनांच्या सद्यस्थितीचा जिल्हानिहाय आढावा मुख्यमंत्र्यांनी घेतला. उपमुख्यमंत्री अजित पवार, पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री गुलाबराव पाटील, आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे, राज्यमंत्री पंकज भोयर, योगेश कदम, मेघना बोर्डीकर, मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्यासह संबंधित विभागाचे सचिव उपस्थित होते.

शहरी व ग्रामीण भागातील प्रधानमंत्री आवास योजनांच्या सद्यस्थिती व अंमलबजावणीची माहिती घेऊन मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, भूमीहीन लाभार्थ्यांना घरकुलांसाठी जागा उपलब्ध करून देण्यात महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर आहे, ही आनंदाची बाब आहे, मात्र उर्वरित लाभार्थ्यांना तातडीने जमीन उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समन्वयाने मार्ग काढावेत. ज्या जिल्ह्यांत घरकुलांचे उद्दिष्टपूर्ती कमी आहे, तेथील जिल्हाधिकाऱ्यांनी ती पूर्ण करण्यास प्राधान्य द्यावेत तसेच घरकुल योजनेतील अडचणी दूर करून कामांना वेग द्यावे. गायरान जमिनींवरही आवास योजना राबविण्यासाठी कार्यवाही करावी. आवास योजनांसाठीच्या जमिनींच्या समस्या सोडविण्यासाठी विभागीय आयुक्तांनी प्राधान्य द्यावे.

आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व राज्य शासनाची महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनांचा लाभ राज्यातील रुग्णांना मिळावा यासाठी नोंदणीच्या कामाला गती द्यावी तसेच यामधील मानवी हस्तक्षेप विरहित डिजिटल यंत्रणा सज्ज करण्याचे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

या दोन्ही योजनांचा लाभ लाभार्थ्यांना मिळण्यासाठी जास्तीत जास्त खासगी रुग्णालयांचा तसेच मुंबई शहर व उपनगरातील महापालिकेच्या रुग्णालयांचाही समावेश करावा. आयुष्मान कार्डच्या प्रत्यक्ष १०० टक्के वितरणाकरिता तांत्रिक अडचणी दूर करून वितरणाला गती द्यावी तसेच महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेसाठीही आयुष्मान कार्डसारखे कार्ड तयार करण्यात यावे, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. या योजनामध्ये रुग्णालयांच्या समावेशासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतः लक्ष घालावे, असेही ते म्हणाले.

जल जीवन मिशन योजना ही एक महत्त्वाकांक्षी योजना आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना पिण्याचे पाणी मुबलक उपलब्ध व्हावे यासाठी या योजनेतील कामे गतीने, कालमर्यादेत व गुणवत्ता पूर्ण करावीत. या योजनांचे सोलरायजेशन झाल्यास वीज बिलात बचत होईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

## पाचाड येथील राजमाता जिजाऊ वाड्यामध्ये वणवा

**महाड : प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील पाचाड येथील ऐतिहासिक राजमाता जिजाऊ वाड्याला सोमवारी (दि. ३) वणव्याची झळ बसली. यामुळे या वास्तूचे नुकसान झाले आहे.



छत्रपती शिवाजी महाराजांच्या मांसाहेब जिजाऊ यांचा राजवाडा पाचाड येथे आहे. या राजवाड्याच्या संरक्षक भिंती आणि जोत्याचे अवशेष शिल्लक आहेत. येथील भिंतींचे व परिसरातील गवत काढले न गेल्यामुळे सोमवारी दुपारी २च्या सुमारास शेजारून आलेला वणवा राजवाड्यातील उगवलेल्या गवताला लागला. त्यामुळे येथे काम करणाऱ्या पुरातत्व विभागाच्या कर्मचाऱ्यांची धावपळ उडाली.

ऐतिहासिक वास्तूंच्या परिसरात अशा प्रकारे वणवे लागून नुकसान होत आहे. याबाबत पुरातत्व विभागाने तसेच प्रशासनाने वेळीचे उपाययोजना करणे गरजेचे आहे, असे नागरिकांचे म्हणणे आहे.

## रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये क्रीडा दिन

### मान्यवरांची उपस्थिती

**खारघर : रामप्रहर वृत्त**




जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये रविवारी (दि. २) वार्षिक क्रीडा दिन उत्साहात साजरा झाला. या वेळी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी खेळांमध्ये सहभाग घेत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या उपक्रमावेळी संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ.एस.टी. गडदे, राहुल धर्माधिकारी, संचालक अमोघ ठाकूर, शाळेच्या मुख्याध्यापिका राज अलोनी, भाजप जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, खारघर शहर अध्यक्ष प्रवीण पाटील, माजी नगरसेवक नरेश ठाकूर, गुरूनाथ गायकर, माजी नगरसेविका नेत्रा पाटील, आरती नवघरे, संघटक प्रभाकर जोशी, सरचिटणीस दीपक शिंदे, विनोद ठाकूर, दीपक ठाकूर, युवा मोर्चाचे जिल्हा सचिव शुभ पाटील, खारघर अध्यक्ष नितेश पाटील, अक्षय लोखंडे, महिला मोर्चाच्या खारघर शहर अध्यक्ष साधना पवार, सोशल मीडिया सहसंयोजिका स्नेहल बुधाई यांच्यासह पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी सर्वप्रथम क्रीडा ध्वज फडकविण्यात आला तसेच विद्यार्थ्यांना क्रीडा शपथ देण्यात आली. निरनिराळ्या खेळांमध्ये विद्यार्थ्यांनी आपले क्रीडा कौशल्य पणास लावले. यात रेड हाऊस, ब्ल्यू हाऊस, यलो हाऊस, ग्रीन हाऊस यांनी सहभाग घेऊन ब्ल्यू हाऊसने प्रथम क्रमांक मिळवला. पालकवर्गानेसुद्धा स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन उत्साह दाखवला.

पाहुण्यांसमोर विद्यार्थ्यांनी कराटे, जिम्नॅस्टिक, प्री-प्रायमरी डान्स, मास पीटी, लेझीम, पिरॅमिड मार्च पास्ट यांच्या कवायती सादर केल्या. सर्व स्पर्धा झाल्यानंतर विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

## कोकण रेल्वेच्या दोन गाड्यांचे डबे वाढले



**मुंबई : प्रतिनिधी**

कोकण रेल्वे मार्गावरून धावणाऱ्या दोन रेल्वेगाड्यांच्या संरचनेत बदल करण्यात आला असून दोन्ही रेल्वेगाड्यांचे प्रत्येकी दोन डबे वाढले आहेत. वाढीव डब्यांमुळे या रेल्वेगाडीचे एकूण डबे २०वरून २२ होतील.

हजरत निजामुद्दीन-तिरुवनंतपुरम सेंट्रल-हजरत निजामुद्दीन त्रि-साप्ताहिक राजधानी एक्स्प्रेस आणि हजरत निजामुद्दीन-मडगाव-हजरत निजामुद्दीन द्वि-साप्ताहिक राजधानी एक्स्प्रेसला प्रथम श्रेणीचा वातानुकूलित डबा आणि तृतीय श्रेणीचा वातानुकूलित डबा असे दोन डबे कायमस्वरूपी जोडण्यात येणार आहेत.

गाडी क्रमांक १२४३२ हजरत निजामुद्दीन-तिरुवनंतपुरम सेंट्रल त्रि-साप्ताहिक राजधानी एक्स्प्रेसला ४ फेब्रुवारीपासून, तर गाडी क्रमांक १२४३१ तिरुवनंतपुरम सेंट्रल-हजरत निजामुद्दीन त्रि-साप्ताहिक राजधानी एक्स्प्रेसला ६ फेब्रुवारीपासून डबे जोडण्यात येतील. गाडी क्रमांक २२४१४ हजरत निजामुद्दीन मडगाव द्वि-साप्ताहिक राजधानी एक्स्प्रेसला ७ फेब्रुवारीपासून, तर गाडी क्रमांक २२४१३ मडगाव-हजरत निजामुद्दीन द्वि-साप्ताहिक राजधानी एक्स्प्रेसला ९ फेब्रुवारीपासून अतिरिक्त डबे जोडले जातील.

### विदर्भ-कोकणाला जोडणारी विशेष रेल्वेगाडी

धारातीर्थ गडकोट मोहीम २०२५निमित्त नवीन अमरावती ते वीरदरम्यान अनारक्षित विशेष गाड्या चालवणार येणार आहे. त्यामुळे विदर्भ आणि कोकणाला जोडणारी रेल्वेगाडी धावेल. गाडी क्रमांक ०११०१ विशेष रेल्वेगाडी नवीन अमरावती येथून ६ फेब्रुवारी रोजी दुपारी ३.३० वाजता सुटेल आणि वीर येथे दुसऱ्या दिवशी सकाळी ७.४५ वाजता पोहचेल. गाडी क्रमांक ०११०२ विशेष रेल्वेगाडी वीर येथून ११ फेब्रुवारी रोजी रात्री ११ वाजता सुटेल आणि नवीन अमरावती येथे दुसऱ्या दिवशी दुपारी १२.३० वाजता पोहचेल. या रेल्वेगाडीला बडनेरा, मूर्तिजापूर, अकोला, शेगाव, नांदुरा, मलकापूर, भुसावळ, जळगाव, चाळीसगाव, मनमाड, नाशिक रोड, इगतपुरी, कल्याण, पनवेल, रोहा येथे थांबा असेल.

# महिलांसाठी तालुकास्तरावर अस्मिता भवन उभारावे

## मंत्री आदिती तटकरे यांचे निर्देश; महिलांना औद्योगिक क्षेत्रात सक्षम करण्यावर भर

**मुंबई : प्रतिनिधी**

महिलांना औद्योगिक क्षेत्रात सक्षम करण्यासाठी तालुकास्तरावर अस्मिता भवन उभारण्याच्या प्रक्रियेस गती द्यावी. बाजारपेठ असलेल्या तालुकास्तरावर हे भवन उभारण्यात येणार असून, यामध्ये 'माविम'च्या जास्तीत जास्त महिला बचतगटांना व्यवसाय करण्याची संधी प्राप्त होणार असल्याचे महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले.

मंत्रालय येथील दालनात रोहा येथे गारमेंट प्रकल्प कार्यान्वित करणे, तालुकास्तरावर अस्मिता भवन उभारणे, महिला आर्थिक विकास महामंडळाचे कामकाज, राज्य बालहक्क संरक्षण आयोग तसेच १०० दिवस कृती आराखड्याबाबत बैठक झाली. यावेळी विभागाचे सचिव डॉ.अनुपकुमार यादव, आयुक्त कैलास पगारे, 'माविम'च्या कार्यकारी संचालक वर्षा लटा, राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या अध्यक्षा सुशीबेन शहा, विभागाचे सहसचिव वि. रा. ठाकूर, अवर सचिव सुनिल सरदार, उपसचिव आनंद भोंडवे आदिंसह अधिकारी उपस्थित होते.

महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, श्रीवर्धन येथे सोलार फिश ड्राईंग प्रोजेक्ट अंतर्गत महिला आर्थिक विकास महामंडळ मार्फत नव तेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण उद्यम विकास प्रकल्प राबविण्यात येणार आहे. या प्रकल्पांतर्गत बाजारभिमुख उद्योग विकास घटकांतर्गत शेती, शेतीसंलग्न व बिगर शेती आधारित उद्योगांना व नाविन्यपूर्ण उपक्रमासाठी प्रोत्साहन देण्यात येणार आहे.



रोहा येथील गारमेंट प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठीचे युनिट शहरासह ग्रामीण भागातही सुरू करण्यात यावे. प्रकल्पासाठी पात्र महिलांना योग्य प्रशिक्षण आणि मानधन मिळण्यासाठी पारदर्शक कार्यप्रणाली राबवावी. या प्रकल्पाच्या माध्यमातून जास्तीत जास्त महिलांना रोजगार उपलब्ध होण्यासाठी प्रयत्न करण्याचे निर्देशही तटकरे यांनी दिले.

महिला आर्थिक विकास महामंडळाच्या ५० व्या वर्धापन दिनानिमत्त 'माविम' अंतर्गत असलेल्या जास्तीत जास्त बचतगटांना व्यासपीठ उपलब्ध व्हावे, तसेच 'माविम'चे कार्य ग्रामीण भागातही पोहोचावे यासाठी राज्यस्तरीय महोत्सवाचे आयोजन करण्याचे निर्देश मंत्री तटकरे यांनी दिले.

बालकांच्या हक्क आणि संरक्षणासाठी कार्यरत असलेल्या राज्य बाल हक्क संरक्षण आयोगामधील रिक्त पदे कायम स्वरुपासह बाह्यस्त्रोत व कंत्राटी पद्धतीने भरण्यात येणार आल्याची माहिती सचिव अनुपकुमार यादव यांनी दिली.

**राज्यस्तरीय बाल महोत्सवात साहित्यिक बालकांना व्यासपीठ उपलब्ध करावे**

बालगृह व निरीक्षण गृहातील प्रवेशितांसाठी दरवर्षी राज्यस्तरीय बालमहोत्सव आयोजित करण्यात येणार आहे. या महोत्सवाअंतर्गत जी बालके कथा, कविता लिहितात, ज्यांचे साहित्य प्रसिद्ध आहे अशा साहित्य क्षेत्राशी निगडीत असलेल्या बालकांसाठी विशेष व्यासपीठ या बालमहोत्सवात उपलब्ध करून देण्याचे निर्देश महिला व बालविकास मंत्री तटकरे यांनी दिले. त्यांनी विभागातील विविध योजना आणि कामांचा तसेच १०० दिवस कृती आराखड्यासंदर्भात आढावा घेतला.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत गरोदर महिला, स्तनदा माता, बालके यांना घरपोच आहार, लाभार्थी बालकांचे ग्रोथ मॉनिटरींग, लाभार्थ्यांना गृहभेटीद्वारे मार्गदर्शन, पोषण विषयक जनजागृतीकरिता समुदाय आधारित कार्यक्रम, ग्राम बाल विकास केंद्र, नागरी बाल विकास केंद्र, अंगणवाडी केंद्रांना शौचालय, पिण्याच्या पाण्याची सोय, जीवन ज्योती विमा योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, भिक्षेकरींच्या कामाचा मोबदला, पिंक रिक्षा, लाडकी बहीण योजना, फिरते पथक यासंदर्भातही या वेळी आढावा घेण्यात आला.

# पेण रेल्वे स्टेशनसमोर इको गाडीला बसची धडक; तिघे किरकोळ जखमी

**पेण : प्रतिनिधी**

रेल्वेस्टेशन जवळील रस्त्यावर पेण वडखळ बाजूकडून पेण बाजूकडे जाणाऱ्या इको कारला मागून आलेल्या बसची धडक बसून या अपघातात ३ जण किरकोळ जखमी झाले आहेत.

शनिवार १ फेब्रुवारी रोजी सकाळी ७ च्या सुमारास इको कार क्र. एम.एच.०६ बी.डब्ल्यु. २८९० ही वढाव येथुन पेण ईको स्टँन्डमध्ये धंदयासाठी दोन प्रवासी व फिर्यादी यांची पत्नी यांना ईको कार मध्ये पाठीमागे बसवुन पेण येथे येत असताना ओव्हर ब्रिजच्या बाजुला पेण रेल्वे स्टेशनचे समोरील बोगदया मधुन पेण बाजुकडुन वडखळ बाजुकडे एस.टी.बस येत असल्याने फिर्यादी यांनी आपली गाडी थांबवली

यावेळी पाठीमागुन येणारी इलेक्ट्रीक बस क्रमांच एम.एच.०६ सी.पी ०२८६ नेअतिवेगाने ईको कारला पाठीमागुन ठोकर दिली. या अपघातात ईको कारमधील बसलेले प्रवासी साध्या दुखापती होऊन वाहनाचे नुकसान झाले. याबाबत पेण पोलीस ठाण्यात गुन्हा गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सहाय्यक फौजदार देविदास पाटील हे करीत आहेत.

# मुरूड शहरातील भोगेश्वर पाखाडीत १० घरे फोडली; तपास सुरू

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड शहरातील भोगैश्वर पाखाडी परिसरात रात्री अज्ञात चोरटयांनी दहा घरांचे लॉक तोडून घराच्या आतील ऐवज लंपास केला असल्याची शंका व्यक्त करण्यात येत आहे.सदरील घरातील लोक मुंबई येथे वास्तव्यास असल्याने यातील बहुतेक घरे बंद होती.अज्ञात चोरटयांनी या संधीचा फायदा उठवत भोगेश्वर पाखाडीमधील दहा घरांचे लॉक तोडले आहेत.घरातील मालक वर्ग अद्यापर्यंत न आल्याने घरातून काय चोरीला गेले याचा तपशील कळलेला नाही.



मुरुड पोलिसांनी घटना स्थळाला भेट देऊन घटनास्थळाची पाहणी केली आहे. तातडीने फिंगर प्रिंट्स विभागास सुद्धा आमंत्रित करण्यात आले आहे,.घराला असणारे लॉक कडी कोयडांच्या आधारे तोडले असावेत असा कयास व्यक्त करण्यात येत आहे. मुरुड पोलीस ठाण्यात अद्यापर्यंत कोणीही तक्रार दाखल केली नसली तरी पोलीस तपास करीत आहेत. प्रत्यक्ष घराचे मालक आल्यावरच किती रक्कमेचा ऐवज गायब झाला आहे ते कळेल.

# नांदगाव बंदर येथे बैलगाडी स्पर्धा रंगली

**रेवद्दंडा : प्रतिनिधी**

मुरुड तालुका भाजप तालुका अध्यक्ष शैलेश काते यांच्या वाढदिवसाचे औचित्यसाधून भव्य बैलगाडी स्पर्धा नांदगाव मुरुड बंदर येथे संपन्न झाल्या. यामध्ये मुरुड तालुक्यातील नांदगाव बंदर येथे झालेल्या बैलगाडी स्पर्धेत स्वर्गीय श्रीनिवास भगत, आवास यांची गाडी फायनल गटात प्रथम क्रमांकाची विजेते ठरली. तर उपविजेते परवेज बेलोस, काशीद व तृतीय क्रमांक अमोल कोतवाल, नांदगाव यांना मिळाला

बैलगाडी स्पर्धेचा शुभारंभ भाजप व्ही.जे.एन.टी. आघाडीचे प्रदेशाध्यक्ष तथा लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष राहुल भैय्या केंद्रे यांच्या हस्ते झाले.याप्रसंगीभटके विमुक्त आघाडी भाजप महाराष्ट्र राज्य सरचिटणीस राजू साळुंखे यांनी स्पर्धा यशस्वी होण्यासाठी मोलाचे सहकार्य केले. भाजप रायगड जिल्हा सरचिटणस ॲड. महेश मोहिते, आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते बैलगाडी स्पर्धेचे पारितोषिक वितरण करण्यात आले. सर्व गटातील स्पर्धकांना प्रथम क्रमांक, द्वितीय क्रमांक, तृतीय क्रमांक अशा विजेत्या स्पर्धकांना रोख पारितोषिक व सन्मानचिन्ह मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले.



यावेळी भाजप प्रदेशाध्यक्ष राहुल भैया केंद्रे यांनी आयोजकांचे व सर्व स्पर्धकांचे व भाजप तालुका अध्यक्ष शैलेश काते यांचे विशेष कौतुक केले तसेच भाजप राज्य सरचिटणीस राजू साळुंखे यांनी मोलाचे मार्गदर्शनकेले. सदर स्पर्धा पाहण्यासाठी बैलगाडी प्रेमी मोठ्या संख्येने हजर होते. आयोजकांच्या वतीने उपस्थित मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.

काशीद ग्रामपंचायत सरपंच संतोष राणे, घाटवाल वेलासग्रामपंचायत माजी सरपंच शरद खेडेकर, शिवसेना उपजिल्हाप्रमुख भरत बेलोसे, तालुका संघटक यशवंत पाटीलसंदीपचिरायू तसेच मुरुड तालुका व अलिबाग तालुका रोहा परिसरातील विविध क्षेत्रातील मंडळी तसेचपंचक्रोशीतील सरपंच उपसरपंच सदस्य उपस्थित होते.

बैलगाडी स्पर्धा एकूण आठ गटात खेळवण्यात आली. सेमी फायनल गटात सागर मिस्त्री, खारीक पाडा प्रथम क्रमांक, द्वितीय सई मयेकर, चालमळा, तृतीय क्रमांक वेदिकापाटील झिराड ,हे सेमी फायनल गटात यशस्वी ठरले.तसेच घोडा गाडी स्पर्धेत अन्वर कुरेशी थळ अलिबाग यांची गाडी प्रथम आली.


# एनडी स्टुडिओला उच्च न्यायालयाकडून दिलासा

## कंपनीविरुद्धचा प्राप्तिकर विभागाचा आदेश रद्द

**नेरळ : प्रतिनिधी**

दिवंगत कला दिग्दर्शक नितीन देसाई यांच्या एनडीज् आर्ट वर्ल्ड प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीविरुद्ध प्राप्तिकर विभागाने दिलेला आदेश आज उच्च न्यायालयाने रद्द केला आहे. केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाच्या सीबीडीटी योग्य परवानगीशिवाय अतिरिक्त प्राप्तिकर आयुक्तांनी हा आदेश काढला होता. त्यामुळे, तो घटनाबाह्य असल्याने न्यायालयाने तो रद्द केल्याचे निकालावेळी प्रामुख्याने म्हटले आहे.

सन २०२०-२१ या कर निर्धारण वर्षासाठी एनडीज् आर्ट वर्ल्ड प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे प्राप्तिकर विवरणपत्र दाखल करण्यास झालेल्या १० महिन्यांच्या विलंबाशी संबंधित हे प्रकरण होते.दरम्यान करोना काळात सामोरे जाव्या लागलेल्या अडचणींचा हवाला देऊन एनडीज् आर्ट वर्ल्डने हा विलंब माफ करण्याची मागणी प्राप्तिकर विभागाकडे केली होती.मात्र प्राप्तिकर उपायुक्तांनी ही मागणी फेटाळून




लावल्याने, एनडिज कंपनीने प्राप्तिकर उपायुक्तांच्या आदेशाला उच्च न्यायालयात आव्हान देणारी याचिका दाखल केली होती. न्यायमूर्ती महेश सोनक आणि न्यायमूर्ती जितेंद्र जैन यांच्या खंडपीठाने एनडीज् आर्ट वर्ल्डने केलेला युक्तिवाद मान्य केला व प्राप्तिकर विभागाचा आदेश घटनाबाह्य ठरवून रद्द केला असल्याचे आता समोर आले आहे.

कला दिग्दर्शक दिवंगत नितीन देसाई यांनी आपल्याच एनडीज् स्टुडिओ मध्ये ऑगस्ट २०२३ मध्ये गळफास घेत जीवन संपविले होते.दिवाळखोरीत कंपनी गेल्याने त्यांनी हे पाऊल उचलल्याची चर्चा होती. कंपनी २५२ कोटी रुपयांचे कर्ज फेडू न शकल्याने कंपनीविरुद्ध दिवाळखोरीची कारवाई सुरू करण्यात आली होती. एनडीज आर्ट वर्ल्डने सन २०१६ आणि २०१८ मध्ये ईसीएल फायनान्सकडून १८५ कोटी रुपये कर्ज घेतले होते. परंतु, जानेवारी २०२० पासून कर्जाची परतफेड करण्यात अडचणी येऊ लागल्याने राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाच्या (एनसीएलटी) मुंबई खंडपीठाने २५ जुलै २०२३ रोजी एडेलवाईस ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनीने कॉर्पोरेट दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया सुरू करण्यासाठी दाखल केलेली याचिका स्वीकारली होती

पान १ वरुन

## कामोठ्यात आमदार आपल्या दारी!

एकूणच नागरिकांच्या समस्या आणि सूचनांचा विचार करून त्यांना योग्य ते सहकार्य आणि त्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्याची ग्वाही आमदार प्रशांत ठाकूर यांनी या वेळी दिली.

या कार्यक्रमाला भाजपचे कामोठे शहराध्यक्ष रवींद्र जोशी, माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, विकास घरत, माजी नगरसेविका कुसुम म्हात्रे, हेमलता गोवारी, महिला मोर्चा शहराध्यक्ष वनिता पाटील, हॅप्पी सिंग, प्रदीप भगत, भाऊ भगत, राजेश गायकर, हर्षवर्धन पाटील, विद्या तामखडे, तेजस जाधव, दामोदर चव्हाण यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पनवेल विधानसभा क्षेत्रात नमो चषक भव्य क्रीडा महोत्सव

कुस्ती स्पर्धेतील महिला ३५, ४० व ४५ किलो वजनाखालील गटातील प्रत्येकी विजेतीला एक हजार रुपये व उपविजेतीस ५०० रुपये, ५० किलोखालील गटातील विजेतीला १५०० रुपये व उपविजेतीस एक हजार रुपये, ५५ किलो वजनाखालील गटातील विजेतीला दोन हजार रुपये व उपविजेतीस १५०० रुपये आणि ५७ ते ७६ किलो वजनाखालील गटातील विजेतीस १० हजार रुपये व नमो केसरी मानाची गदा, द्वितीय क्रमांकाला पाच हजार रुपये, तृतीय क्रमांकाला तीन हजार रुपये, १७ वर्षाखालील मुले ३०, ३५, ४० व ४५ किलो वजनाखालील गटातील प्रथम क्रमांकास प्रत्येकी एक हजार रुपये, द्वितीय क्रमांकाला ५०० रुपये, ५० व ५५ किलोखालील गटातील प्रथम क्रमांकाला प्रत्येकी १५०० रुपये, द्वितीय क्रमांकास प्रत्येकी एक हजार रुपये, ६०, ६५ आणि ७० किलो वजनाखालील गटातील प्रथम क्रमांकास अनुक्रमे दोन हजार रुपये, तीन हजार रुपये आणि पाच हजार रुपये, द्वितीय क्रमांकास अनुक्रमे १५००, दोन हजार आणि तीन हजार रुपये, वरिष्ठ मुले ५० ते ६० किलो वजनाखालील गटातील प्रथम क्रमांकाला तीन हजार रुपये, द्वितीय क्रमांकास दोन हजार रुपये, ६० ते ७० किलो वजनाखालील गटातील प्रथम क्रमांकाला पाच हजार रुपये, द्वितीय क्रमांकास तीन हजार रुपये, ७० ते ७९ किलो वजनाखालील गटातील प्रथम क्रमांकाला पाच हजार रुपये, द्वितीय क्रमांकास तीन हजार रुपये तसेच ७९ ते १२५ किलो वजनाखालील गटातील प्रथम क्रमांकाला १० हजार रुपये व नमो केसरी मानाची गदा, द्वितीय क्रमांकास पाच हजार रुपये, तर तृतीय क्रमांकाला तीन हजार रुपये अशी कुस्ती स्पर्धेत एकूण आठ लाख ५१ हजार रुपयांची बक्षिसे असणार आहेत.

मागील महिन्यात उलवे नोडमध्ये नमो चषक मोठ्या भव्य स्वरूपात आणि दिमाखदारपणे पार पडला. सात हजारांहून अधिक स्पर्धकांनी आणि हजारो क्रीडारसिकांनी या स्पर्धेचा लाभ घेतला होता. त्याच अनुषंगाने या स्पर्धाही भव्य दिव्य आणि उत्कृष्ट नियोजनात होणार आहेत. या पार्श्वभूमीवर स्पर्धेची जय्यत तयारी सुरू आहे.

# सामाजिक बांधिलकीच्या भूमिकेतून भाताचा विचार करा -कुलगुरू डॉ. भावे

**कर्जत : रामप्रहर वृत्त**

नावीन्यपूर्ण कृषीकडे वळताना कृषी परिसंस्था बदलू नका, त्यामुळे सामाजिक समस्या निर्माण होतात. सोयाबीन, बी. टी.कापसाचे उत्पादन ज्या भागात होते त्याठिकाणी शेतकरी आत्महत्या सारख्या समस्या उद्‌भवल्या मात्र कोकणातील भात उत्पादन क्षेत्रात अशी समस्या नसल्याने सामाजिक बांधीलकीच्या माध्यमातून भाताचा विचार करा ,असे स्पष्ट प्रतिपादन डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय भावे यांनी येथे केले.

प्रादेशिक कृषी संशोधन केंद्राच्या सह्याद्री अतिथी गृह सभागृहात आयोजित ५९ व्या महाराष्ट्र राज्य वार्षिक गट सभेच्या उद् घाटनपर समारंभात अध्यक्षीय मार्गदर्शन करताना ते बोलत होते. व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय कृषी




अनुसंधान परिषद,नवी दिल्लीचे माजी सहायक महासंचालक डॉ. नारायण जांभळे, इक्रिसॅट हैद्राबादचे माजी उपमहासंचालक डॉ. अरविंदकुमार , डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे विस्तार शिक्षण आणि संशोधन संचालक डॉ. पराग हळदणकर , कुलसचिव डॉ. प्रदीप हळदवणेकर, विद्यापीठाचे विस्तार परिषद सदस्य विलास म्हात्रे,सहयोगी संशोधन संचालक आणि भात विशेषज्ञ डॉ.भरत वाघमोडे उपस्थित होते.

डॉ.भावे यांनी पुढे बोलताना पर्यावरणाच्या दृष्टीने जागरूक उपाय अंमलात आणण्यासाठी जागतिक स्तरावर विचार करा, स्थानिक पातळीवर काम करा असा सल्ला शास्त्रज्ञांना दिला.बाहेरील सुरक्षेसोबत भात उत्पादक शेतकऱ्यांची आंतरिक सुरक्षा अन्न सुरक्षेसाठी महत्त्वाची आहे, असे ते म्हणाले.भाताखालील जमिनीची किंमत जास्त असून शास्त्रज्ञांनी सादर केलेल्या अहवालावरून भात पीक गरिबीकडून समृद्धीकडे वाटचाल करीत असल्याचे निरीक्षण त्यांनी नोंदविले.विद्यापीठाचे बियाणे कमी पडल्याने स्थानिक वाण शेतकऱ्यांकडून घेतले जातात, त्यासाठी शास्त्रज्ञांनी बीजोत्पादन वाढविण्याची गरज आहे, असे त्यांनी सांगितले.अन्य पिकांना ज्याप्रमाणे शासकीय स्तरावरून भरघोस सुविधा दिल्या जातात त्याच धर्तीवर भाताला राजाश्रय मिळायला हवा, असे मत त्यांनी मांडले.कृषिशी निगडित आपल्या सर्व समस्या आपल्यालाच सोडवाव्या लागतील असे सांगितले

डॉ.जांभळे यांनी , विविध प्रदेशांच्या गरजेनुरूप जीवनसत्त्वे, खनिजे आणि इतर पोषक तत्वे अधिक असलेल्या भात जाती विकसित करून गरिबी निर्मूलनासाठी भात हे व्यावसायिक पीक होण्यासाठी लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे.वाढत्या लोकसंख्येच्या अन्नधान्याची गरज भागविण्यासाठी भात क्षेत्र कमी न करता उत्पादन वाढविणे, संकरित बीजोत्पादन तंत्रज्ञानात सुधारणा करून उत्पादन वाढविणे तसेच ' स्पीड ब्रिडिंग ', 'जिनोम एडिटिंग', 'सिंथेटिक अपोमिक्सिस ' सारख्या नवतंत्रज्ञानाचा अवलंब करणे आवश्यक आहे.चिखलनी ऐवजी पेरभाताकडे वळणे गरजेचे असून त्यासाठी नवे वेगळे वाण तयार करणे अपरिहार्य असल्याचे सांगितले

या निमित्ताने मान्यवरांच्या हस्ते वार्षिक अहवालाचे प्रकाशन करण्यात आले.बैठकीला वाराणसीचे भात गुणवत्ता विशेषज्ञ डॉ. सौरव बदौणी आणि आंतरराष्ट्रीय भात संशोधन संस्था फिलिपाईन्सचे जगप्रसिद्ध संकरित भात शास्त्रज्ञ डॉ. जोहर अली हे दुरदृश्य प्रणालीद्वारे व महाराष्ट्राच्या चारही कृषी विद्यापीठातील भात संशोधनाशी निगडित एकूण ४९ शास्त्रज्ञ उपस्थित होते.

# २६ कृत्रिम तलावात ५८२ गणेशमूर्तींचे विसर्जन

**नवी मुंबई :बातमीदार**

उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राज्यात प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींची विक्री करण्यास बंदी असून त्या पीओपी मूर्तींच्या नैसर्गिक तलावांमधील विसर्जनासाठी बंदी आहे. त्यास अनुसरुन नवी मुंबई महानगरपालिकेने आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका क्षेत्रात माघी गणेशात्सवातील श्री मूर्ती विसर्जनासाठी ठिकठिकाणी २६ कृत्रिम विसर्जन तलावांची निर्मिती केली होती.

महापालिका क्षेत्रात एकूण १ हजार २७५ श्रीमूर्तींचे विसर्जन झाले.



त्यामध्ये कृत्रिम विसर्जन तलावात ५८२ पीओपीच्या श्रीमूर्तींचे विसर्जन करण्यात आले. त्याचप्रमाणे ६९३ शाडू मातीच्या श्रीमूर्तींपैकी ३४ श्रीमूर्तींचे कृत्रिम विसर्जन तलावात विसर्जन करण्यात आले. ६५९ शाडू मातीच्या श्रीमूर्ती हया महापालिका क्षेत्रातील २२ नैसर्गिक विसर्जन तलावात विसर्जित करण्यात आल्या.

उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पीओपीच्या श्रीमूर्तींचे कृत्रिम तलावातच विसर्जन करावे, असे जाहीर आवाहन महापालिकेतर्फे करण्यात आले होते.त्याला भक्तांनी प्रतिसाद दिल्याने विसर्जन सोहळा सुनियोजित पध्दतीने निर्विघ्नपणे पार पडला.

### विभागवार आकडेवारी

कृत्रिम विसर्जन तलावात बेलापूर विभागात १२० पीओपी मूर्ती, नेरुळ विभागात ४१, वाशी विभागात ११४, तुर्भे विभागात ११८, कोपरखैरणे विभागात ७, घणसोली विभागात ९७, ऐरोली विभागात ७८ व दिघा विभागात ७ अशा प्रकारे ८ विभागांत २६ कृत्रिम विसर्जन तलावांवर ५८२ पीओपी मूर्तींचे विसर्जन करण्यात आले.

# दुचाकीवर हुलकावणी दिल्याच्या रागातून खून; खारघरमधील घटना

**पनवेल :** खारघर उत्सव चौकाच्या जवळ दोन दुचाकीस्वारांचे वाहन पुढे दामटविणे आणि हुलकावणी दिल्याने भांडण झाले. भांडणाचे स्वरुप मारहाणीत झाले. हेल्मेटने वारंवार शिवकुमार याच्या डोक्यात चारवेळा मारहाण केल्यामुळे तो अत्यवस्थ झाला.

खारघर पोलीस ठाण्यात या घटनेबाबत स्वत: शिवकुमार हे दुचाकी चालवून गेले. तेथे त्यांनी २२ वर्षीय हिरव्या रंगाचा व २५ वर्षीय काळ्या रंगाच्या झब्बा घातलेल्या संशयित मारेकऱ्यांविरोधात हत्येचा गुन्हा नोंदविला. पोलिसांना त्यांनी सर्व आपबीती सांगितली. पोलिसांनीसुद्धा तक्रार लिहून घेतली. तक्रार लिहिण्याच्या अखेरच्या क्षणी शर्मा बेशुद्ध झाले. पोलिसांनी शर्मा यांना तातडीने मेडीसीटी रुग्णालयात दाखल केले, मात्र रुग्णालयातील डॉक्टरांनी शर्मा यांचा मृत्यू झाल्याचे सांगितले.

## निवडक

### शॉक लागून एकाचा मृत्यू

**पनवेल :** आपल्या घरातील बाथरुमधील बल्ब चालू करीत असताना वायरला पीन नसल्याने मोकळ्या वायरला हात लागून ती शॉकेटमध्ये घालून लाईट चालू करण्याचा प्रयत्न करताना त्याचा शॉक लागून एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना तालुक्यातील कुंडेवहाळ गावात घडली आहे. सदाशिव गायकवाड (वय ४५) असे या व्यक्तीचे नाव असून त्यांचा या घटनेमध्ये दुर्दैवी मृत्यू झाला आहे. याबाबतची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### प्रॉपर्टी एजंटला मारहाण

**पनवेल :** प्रॉपर्टी एजंटला अज्ञात व्यक्तीकडून मारहाण झाल्याची घटना पनवेल शहरातील तक्का येथील स्टेट बँकेजवळ घडली आहे. बादशाह राजासाहब पटेल (वय ३२) यास अनोळखी व्यक्तीने आर्थिक व्यवहाराच्या माध्यमातून त्याला तक्का येथील स्टेट बँकेजवळ बोलावून मारहाण केली आहे. तसेच त्याच्याकडे असलेली स्वीफ्ट डिझायर कार व मोबाईल फोन असा मिळून पाच लाख ३० हजार रुपये किंमतीचा ऐवज घेवून ते पसार झाले आहेत. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### बनावट नोटांद्वारे फसवणूक

**पनवेल :** बनावटी नोटा वितरित करून एका दुकानदाराची फसवणूक केल्याप्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नवीन पनवेल जीवराज भाटी यांचे किराणा दुकान असून त्यांच्या दुकानात एक व्यक्ती १०० रुपयाच्या तीन नोटा घेऊन आला व त्याने जवळपास २६५ रुपये किंमतीचा माल खरेदी केला व त्याच्या जवळील १००च्या बनावट नोटा दुकानदाराला दिल्या. पुन्हा काही दिवसाने तो व्यक्ती परत त्यांच्या दुकानात आला व त्याने तीन किलो पीठ खरेदी केले या वेळी १०० रुपयांच्या दोन नोटा दुकानदाराला दिल्या. त्या नोटासुद्धा बनावट दिसून आल्याने त्यांनी याबाबतची माहिती खांदेश्वर पोलिसांना दिली. त्यानुसार त्यांनी या व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

### शटर उघडून पैसे, मोबाईल चोरी


**पनवेल :** शटरमधून आत प्रवेश करून रोख रक्कमेसह मोबाईलची अज्ञात चोरट्याने चोरी केल्याची घटना कोपरा गाव येथे घडली आहे. उस्मान खान यांच्या चिकन सेंटरच्या बाजूला असलेल्या पत्र्याच्या रूममध्ये ते राहतात. अज्ञात चोरट्याने त्यांच्या खोलीच्या शटरमधून आत प्रवेश करून मोबाईल फोन आणि रोख रक्कम असा मिळून जवळपास ४५ हजाराचा मुद्देमाल चोरून नेल्याने याबाबतची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### पतीकडून पत्नीला मारहाण

**पनवेल :** मुलीला का ओरडता असे विचारणा करण्यासाठी पतीकडे गेलेल्या पत्नीला मारहाण केल्याची घटना तालुक्यातील उसर्ली खुर्द येथे घडली आहे. या ठिकाणी राहणाऱ्या महिलेने आपल्या मुलीला का ओरडता हे विचारणा करण्यासाठी त्या पतीकडे गेल्या असता पतीने लाटण्याने तीला मारहाण केल्याने व त्यात ती जखमी झाल्याने याबाबतची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### खारघरमधून एक जण बेपत्ता

**पनवेल :** राहत्या घरातून एक व्यक्ती कुठेतरी निघून गेल्याने तो हरविल्याची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आली



आहे. के.आर.सुरेश (६६ रा.केंद्रीय विहार, खारघर) रंग सावळा, उंची पाच फुट सात इंच, बांधा सडपातळ असून अंगात हिरवा टी-शर्ट व ब्राऊन पँन्ट, पायात सॅण्डल आहे व त्याला इंग्लिश, हिंदी, मल्याळम, तमीळ ही भाषा अवगत आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी खारघर पोलीस ठाणे किंवा हवालदार एस.एस.गोसावी यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### १० फेब्रुवारीला लोकशाही दिन

**नवी मुंबई :** कोकण विभागीय स्तरावरील लोकशाही दिन सोमवार दि. १० फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता कोकण भवनातील विभागीय आयुक्त कार्यालयाच्या समिती सभागृह, पहिला मजला, कोकण भवन, नवी मुंबई येथे आयोजित करण्यात आला आहे. लोकशाही दिनाच्या बैठकीस सर्व विभागीय स्तरावरील कार्यालय प्रमुख यांनीच उपस्थित असणे आवश्यक आहे. काही अपरिहार्य कारणामुळे उपस्थित राहणे शक्य नसल्यास त्यांनी विभागीय आयुक्त यांची परवानगी घेणे आवश्यक आहे, असे कोकण विभागाचे अपर आयुक्त (सामान्य प्रशासन) संजीव पलांडे यांनी कळविले आहे.

# मानसरोवर येथे रस्ता कामाचा शुभारंभ

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते रेल्वे स्टेशन येथे भूमिपूजन





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मानसरोवर रेल्वे स्टेशन येथील रस्त्याच्या डांबरीकरणाचा शुभारंभ सोमवारी (दि.३) पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाला.

दरम्यान, पनवेल विधानसभा मतदारसंघात चौथ्यांदा आमदार प्रशांत ठाकूर निवडून आल्याबद्दल त्यांच्या सत्काराचेही आयोजन करण्यात आले होते. कामोठे शहरातील विकासासाठी भारतीय जनता पक्ष आणि मी आमदार म्हणून नेहमी तत्पर राहीन. नागरिकांच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडवण्याचा प्रयत्न आमदार आपल्या दारी या उपक्रमांतर्गत करतोय. नागरिकांना सोयी सुविधा देण्यासाठी आपण सर्वांनी नेहमी पुढे राहायला पाहिजे, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले.

या भूमिपूजन सोहळ्याला भाजपचे कामोठे शहराध्यक्ष रवी जोशी, माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, सामाजिक कार्यकर्ते रवी गोवारी, शहराध्यक्ष वनिता पाटील, विद्या तामखडे, आत्माराम मस्कर, महेंद्र भोपी, सदानंद भोईर, हरिश्चंद्र जोशी, एस के भगत, चंद्रकांत कडू, मानाजी पाटील, संदेश भोपी, अरुणशेठ पाटील, दिलीप गोंधळी, मयूर चिपळेकर, अंकुश शेठ भोईर, मनोहर भोपी, भाऊ भगत, आत्माराम मस्कर, सदानंद भोईर, बाळाराम भोपी, हनुमान जोशी, सुनिता ठाकूर, जयेंद्र जोशी, आशिष भेंडे, विराज भोपी, संदेश भोपी आदी उपस्थित होते.

## कामोठ्यात हळदीकुंकू समारंभ उत्साहात





**कामोठे : रामप्रहर वृत्त**

भाजप कामोठे मंडळ आणि वैल्यू स्माईल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने हळदीकुंकू समारंभाचे आयोजन रविवारी (दि.२) कामोठे शहरातील विस्टा कॉर्नर येथे करण्यात आला होता.



या कार्यक्रमाला पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट दिली. वैल्यू स्माईल फाउंडेशनच्या हरजिंदरकौर सिंग, अल्पसंख्याक आयोगाचे सदस्य हॅप्पी सिंग यांच्यावतीने या हळदीकुंकू समारंभाचे आयोजन केले होते.

या हळदी कुंकू समारंभाला कामोठे शहराध्यक्ष रवी जोशी, पनवेल महानगरपालिकेच्या माजी महापौर कविता चौतमौल, उपमहापौर चारुशीला घरत, शहराध्यक्षा वनिता पाटील, माजी नगरसेवक संतोष शेट्टी, अर्चना ठाकूर, स्वाती कोळी, विद्याताई तामखेडे, स्वप्नाली म्हात्रे, कुसुम म्हात्रे,तेजस जाधव, रोहन पवार,सुदेश आगलावे, कमलेश शिंदे, अभिजित दिवटे, जय गुंजाळ यांच्यासह परिसरातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कळंबुसरेच्या साहिल पाटीलला बीबीए पदवी परीक्षेत सुवर्णपदक

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

पुणे येथील अजिंक्य डी वाय पाटील विद्यापीठाच्या बीबीए (इंटरनॅशनल बिझनेस) २०२१-२०२४च्या पदवी परीक्षेत उरण तालुक्यातील कळंबुसरे गावचा साहिल राजाराम पाटील यांने सुयश प्राप्त केले असून, तो प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होऊन त्याने सुवर्णपदक पटकावले आहे. तसेच विद्यापीठाचा बेस्ट स्टुडन्ट ऑफ द इयर अवॉर्डचादेखील तो मानकरी ठरला आहे. पुणे येथे आयोजित करण्यात आलेल्या पदवीदान समारंभात त्याला मान्यवरांच्या हस्ते सुवर्णपदक देऊन गौरविण्यात आले आहे.

राज्याचे उद्योगमंत्री डॉ. उदय सामंत आणि डॉ.लक्षराज सिंग मेवाड ऑफ उदयपूर, विद्यापीठाचे कुलपती अजिंक्य डी वाय पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत त्याला हा मानाचा व प्रतिष्ठेचा समजला जाणारा आवार्ड प्रदान करण्यात आला. ब्याचलर आ्फ बिझनेस डमिनीस्ट्रेशन (इंटरनॅशनल बिझनेस) या पदवी परीक्षेत अभिमानास्पद कामगिरीबद्दल तो या नेत्रदीपक यशाचा मानकरी ठरला आहे. उरण तालुक्याच्या ग्रामीण भागातील कळंबुसरे



येथील निवृत्त माध्यमिक शिक्षक राजाराम जनार्दन पाटील व कीर्ती पाटील यांचा तो सुपुत्र असून, त्याने हे नेत्रदीपक यश संपादन केले आहे.

सध्या तो मुंबई येथील वेलिंगकर इन्स्टिट्यूट ऑफ म्यानेजमेंट डेव्हलपमेंट अँड अँड रीसर्च, या नामांकित महाविद्यालयात एम.बी.ए.चे शिक्षण घेत आहे. साहिलचा अभ्यासाचा सराव, जिद्द व त्याचा प्रचंड आत्मविश्वास, प्राध्यापकांचे मार्गदर्शन आणि आई-वडिलांचे आशीर्वाद यामुळे त्याला हे यश प्राप्त झाले असल्याचे वडील राजाराम पाटील व आई कीर्ती पाटील यांनी सांगितले. त्याच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून कौतुकाबरोबर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## पीजेबी स्कूलचे स्नेहसंमेलन

**पनवेल : वार्ताहर**

प्रतीक जयंत भोईर मेमोरियल फाउंडेशनच्या पी.जे.बी. नॅशनल पब्लिक स्कूल पळस्पे येथे तिसरी ते आठवीच्या वर्गांचे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात साजरे झाले. या कार्यक्रमाला पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक नितीन ठाकरे व मुंबई हायकोर्टच्या वकील रिंपल त्रिवेदी प्रमुख पाहुणे होते.

या वेळी स्कूलचे चेअरमन डॉ.जयंत भोईर, प्रार्थना भोईर, मदन कोळी (माजी नगराध्यक्ष), प्रमिला त्रिवेदी, सौ व श्री कमलेश अग्रवाल, सौ व श्री संजय पाटील, सौ व श्री दीपक पाटील, सौ व श्री सिद्धेश पाटील,शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. राजेश्री जगदाळे, शिक्षक वर्ग, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

विविध गाण्यांवर विद्यार्थ्यांनी नृत्याविष्कार सादर केले. सूत्रसंचालन शाळेच्या शिक्षिका सानिका पाटील व अंजली कदम यांनी केले.



## संगीत सभेत उमेश चौधरी यांचे गायन

**पनवेल : प्रतिनिधी**

विख्यात तबलावादक पंडित सदाशिव पवार यांच्या स्मृतिदिनानिमित्त सदाशिव अकॅडमी ऑफ म्युझिक यांच्या वतीने झालेल्या एकदिवसीय संगीत सभेत रायगडचे सुपूत्र गायक उमेश चौधरी यांनी आपल्या गायन कलेतून रसिकांना मंत्रमुग्ध केले. या समारंभाला रसिकांचा उत्स्फूर्त लाभला. हा कार्यक्रम अत्यंत सुरेल आणि भक्तिरसात न्हाहून गेला होता.

डोंबिवली येथील गणपती मंदिर वक्रतुंड सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या प्रारंभी कै. पं. सदाशिव पवार यांच्या प्रतिमेस उपस्थित मान्यवरांनी पुष्पमाला अर्पण करून अभिवादन केले.



त्यानंतर रायगड भूषण गायक उमेश चौधरी यांच्या हाती कार्यक्रमाची सूत्र देण्यात आली. त्यांनी 'राग पुरिया धनाश्री' मधील बडा खयाल लयकारी अंगाने सुसूत्रप्रमाणे राग विस्तारित केला. त्यानंतर छोटा खयाल व तराणा विशेष तयारीने पेश केला. व मैफलीच्या शेवटी भारतरत्न पं. भीमसेन जोशी यांच्या 'आता कोठे धावे मन' हा प्रसिद्ध अभंग सादर करून रसिकांची वाहवा मिळवत त्यांची मने जिंकली.

या मैफिली नंतर रसिकांना टाळी धरण्यास भाग पाडले ते म्हणजे रूपक पवार यांच्या तबला सोलो वादनाने. त्यांनी ताल तीनतालमध्ये उस्ताद जाकीर हुसेन यांच्या काही बंदिशी सादर करून त्यांनीही श्रोत्यांची वाहवा मिळवली. त्यांना लेहरा साथ विनोद पडघे यांनी केली. कार्यक्रमाच्या शेवटी ज्येष्ठ गायिका डॉ. पौर्णिमा धुमाळ यांनी राग 'दुर्गा' मधील बडा आणि छोटा खयाल व राग 'बसंत' मधील फगवा ब्रिज देखन हा छोटा खयाल सादर करीत ज्ञानदेव गुरु ज्ञानदेव तारू हा सेनामहाराजांचा अभंग गाऊन श्रोते भक्तीरसात न्हाऊन निघाले. नित्यक्रमाला तबल्यावर निषाद पवार व विनायक नाईक तर हार्मोनियमवर मंदार दीक्षित यांनी उत्कृष्ट साथ दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचान नीता रामतीर्थे यांनी तर ध्वनी मुद्रण सुनील म्हात्रे यांच्या अनुष्का रेकॉर्डिंग स्टुडिओने केले.

## अतिरीक्त आयुक्त डॉ. रसाळ यांना पमपातर्फे सेवानिरोप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेचे अतिरीक्त आयुक्त डॉ. प्रशांत रसाळ यांची राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांचे खासगी सचिव म्हणून नियुक्ती झाली आहे. त्याबद्दल आयुक्त मंगेश चितळे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.




या वेळी अतिरीक्त आयुक्त भारत राठोड, उपायुक्त कैलास गावडे, डॉ.वैभव विधाते, रविकिरण घोडके, मुख्य लेखाधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, सहाय्यक नगररचनाकार केशव शिंदे, मुख्य शहर अभियंता संजय कटेकर, मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, सहाय्यक सर्वश्री स्वरूप खारगे, सुबोध ठाणेकर, श्रीराम पवार, स्मिता काळे, डॉ.रूपाली माने, लेखाधिकारी संग्राम न्होरकाटे आदी उपस्थित होते.

## सेवानिवृत्त अरुण डुंबरे पोलीस पदकाने सन्मानित

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील नेरे येथील सेवानिवृत्त सहायक पोलीस आयुक्त अरुण केरभाऊ डुंबरे यांना प्रजासत्ताक दिनी राष्ट्रपतींच्या गुणवत्तापूर्ण सेवेसाठी त्यांना पोलीस पदकाने सन्मानित करण्यात आले.



अरुण केरभाऊ डुंबरे, सहायक पोलीस आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, पोलीस दलामध्ये जानेवारी १९८७मध्ये दाखल झाले असून सहा. पोलीस उपनिरिक्षक ते सहायक पोलीस आयुक्त पदापर्यंत पोहचून त्यांनी ३८ वर्षांची गुणवत्तापूर्ण सेवा पूर्ण केली आहे.

श्री. डुंबरे यांनी आपल्या सेवेमध्ये सातारा, पुणे, मुंबई, कोल्हापूर, नवी मुंबई आणि राज्य गुप्तवार्ता विभाग मुंबई अशा विविध ठिकाणी जबाबदारीच्या पदांवर काम केले आहे. आपल्या प्रशासकीय जीवनात काम करीत असताना एलएलबीपर्यंत शिक्षण घेवून त्यांनी आपले व्यक्तिमत्व सातत्याने उन्नत ठेवले आहे.

आपल्या ३८ वर्षांच्या सेवाकाळात त्यांना १०३ बक्षिसे तसेच पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचे सन्मानपत्र प्राप्त झाले आहे. डुंबके यांचे अनेकांनी अभिनंदन केले.

## ११ फेब्रुवारीला पेन्शन अदालत

**नवी मुंबई :** कोंकण विभागातील पेन्शन अदालत दरमहा दुसऱ्या मंगळवारी आयोजित करण्यात येते. या महिन्यातील विभागीय पेन्शन अदालत ११ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११ वा. कोकण भवनातील कक्ष क्र. १०६ सामान्य प्रशासन शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय कोंकण भवन येथे आयोजित केली आहे. अदालतीमध्ये महसूल विभागातील सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित पेन्शन प्रकरणांच्या अडचणींचे निवारण करण्यात येणार आहे. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या पेन्शन प्रकरणांबाबतच्या तक्रारी असल्यास त्याबाबतचे अर्ज स्वीकारले जातील. कोकण विभागातील पेन्शन धारकांनी प्रश्न उपस्थित करावे, असे कोकण विभाग तहसीलदार, महेंद्र बेलदार यांनी कळविले आहे.

## कळंबोली येथे हळदीकुंकू समारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सरस्वती महिला औद्योगिक उत्पादक सहकारी संस्था मर्यादित, कळंबोली आणि सरस्वती महिला नागरी सह.पतपेढी मर्या.कळंबोली यांच्यातर्फे रविवारी (दि.२) कळंबोली येथील सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या शाळेमध्ये हळदी कुंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी अध्यक्ष कुंदा गोळे, सचिव सुषमा कामतेकर यांच्यासह प्रमुख पाहुणे रेखाताई रामदास शेवाळे, सायली तुकाराम सरक, मोनिका प्रकाश महानवर (माजी नगरसेविका), ज्योती पाटील (कळंबोली शहर प्रमुख, शिवसेना) चंचला बनकर (शहरप्रमुख खारघर), डी. एन मिश्रा, अॅड. वैशाली पंडित, स्नेहल बागल यांच्यासह अनेक महिला उपस्थित होत्या.



महिला जे करू शकते ते कोणीही करू शकत नाही हा इतिहास आहे. त्यामुळे महिलांचा सन्मान करणे गरजेचे असल्याचे शिवसेना जिल्हा प्रमुख रामदास शेवाळे यांनी सांगितले. यावेळी उपस्थितांची देखील भाषणे झाली. या ठिकाणी हळदीकुंकू सोहळ्यात महिलांची एकजूट दिसून आली. महिलांना सोबत घेऊन महिलांच्या उदात्तीकरणासाठी चळवळ उभारणाऱ्या कुंदा गोळे यांच्या प्रयत्नांमुळे सर्व स्तरातील महिलांनी एका व्यासपीठावर हजेरी लावली. या वेळी महिला आर्थिक काटकसर ते आर्थिक उत्पन्न वाढ या विषयावर महिलांना मार्गदर्शन करण्यात आले.

या हळदीकुंकू समारंभात ज्योत्स्ना गोळे, रूपाली शिवथरे, सुनीता गुरव, अनिता कुलकर्णी, वैशाली सुर्वे, वैशाली महाजन, ज्योती पटेल, सीमा पाटील, पुष्पा शिवजातक, शकुंतला गोगावले, वनिता रिठे, पूजा खानावकर, सुजाता कुरूप यांच्यासह शेकडो महिला उपस्थित होत्या.

## संपादकीय

# दिल्लीकरांना बदल हवा?

दिल्ली विधानसभा निवडणुकीत आप, भाजप आणि काँग्रेस या तिन्ही पक्षांमध्ये मोफत योजना जाहीर करण्याची अहमहमिका लागल्याचे म्हटले गेले. परंतु नुकतीच केंद्रीय अर्थसंकल्पात जाहीर करण्यात आलेली १२ लाखांची प्राप्तीकर सवलत ही या निवडणुकीतील गेमचेंजर ठरेल अशी चर्चा आता आहे. यंदा दिल्लीकरांना बदल हवा आहे असाच सूर या निवडणुकीत सुरूवातीपासून लागत आला असून भाजपने प्रचारादरम्यान हळूहळू या निवडणुकीवर आपली पकड मजबूत केली आहे.

**राजधानी नवी दिल्लीतील विधानसभा निवडणुकीच्या प्रचारतोफा सोमवारी थंडावल्या. दिल्लीत बुधवारी ५ तारखेला मतदान पार पडणार असून ८ तारखेला निकाल जाहीर होईल. दिल्लीतील सुमारे दीड कोटींहून अधिक मतदार या निवडणुकीत मतदानाचा अधिकार बजावतील. दिल्ली विधानसभा मतदारसंघांमध्ये मोठा भाग शहरी असून काही प्रमाणात ग्रामीण भागही आहे. वरकरणी या निवडणुकीत विद्यमान सत्ताधारी आम आदमी पक्ष, भारतीय जनता पक्ष आणि काँग्रेस अशी तिरंगी लढत होत असली तरी, मुख्य लढत भाजप विरुद्ध आप अशीच पहायला मिळणार आहे असे म्हटले जाते. काँग्रेस या निवडणुकीत स्वबळावर लढत असून प्रचाराच्या सुरुवातीच्या काळात काँग्रेस नेते राहुल गांधी, प्रियांका गांधी, पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांचा फारसा सहभाग दिसला नव्हता. काँग्रेसचे खासदारही प्रचारात उतरताना दिसले नाहीत. सत्ताधारी आपने त्यांच्या आधी सुरू असलेल्या सर्व योजना सुरू ठेवण्याचे आश्वासन देत, सोबतच महिला आणि अन्य घटकांकरिताही मोफत योजना जाहीर केल्या. भाजप आणि काँग्रेस या पक्षांनीही महिलांना आर्थिक साह्य, वीज बील सवलत, युवकांसाठी योजना, आरोग्य विमा योजना जाहीर केल्यामुळे या निवडणुकीत तिन्ही पक्षांमध्ये मोफत योजना जाहीर करण्याची अहमहमिका लागल्याचे म्हटले गेले. इतर पक्षांच्या तुलनेत भाजपने देशभरातील सर्वाधिक नेत्यांना दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात उतरवले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही दोन दिवसांचा दिल्ली दौरा करत अनेक सभांना व राजधानीतील मराठी लोकांच्या मेळाव्याला संबोधित केले. दिल्लीतील वाल्मिकी समाजाने गेल्या तीन निवडणुकांमध्ये आपला पाठिंबा दिला होता. मात्र आता या समाजात आपविरोधात नाराजी दिसून येते आहे. राजधानीतील उच्च मध्यमवर्गीय मतदार हे मोठ्या प्रमाणात भाजपच्या बाजूने असण्याची शक्यता आहे. सी-वोटरने १ फेब्रुवारीपर्यंत घेतलेल्या अंदाजानुसार दिल्लीतील ४३.९ टक्के जनता विद्यमान आप सरकारच्या कामावर नाराज आहे. दिल्लीची जनता नेमकी कुणाच्या बाजूने कौल देते हे ८ तारखेलाच स्पष्ट होणार आहे. देशातील सर्वात श्रीमंत महानगरांपैकी एक असलेल्या राजधानी नवी दिल्लीतील सुमारे ४५ टक्के मतदार मध्यमवर्गीय आहेत. राजकीयदृष्ट्या जागरूक असलेल्या या मध्यमवर्गाने दिल्लीच्या राजकारणात कायमच महत्त्वाची भूमिका बजावली आहे. दिल्लीची लोकसंख्या अडीच कोटी असून यापैकी सुमारे १५ लाख लोक प्राप्तिकर दाते आहेत. केंद्रातील भाजपच्या नेतृत्वाखालील सरकारने अर्थसंकल्पात मध्यमवर्गीयांसाठी करसवलतींचे मोठे पाऊल उचलले असून त्याचा लाभ दिल्लीतील किमान निम्म्या प्राप्तिकरदात्यांना होऊ शकेल. यामुळे दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या निकालांवर कितपत परिणाम होतो हे येत्या ८ तारखेला स्पष्ट होईल. निवडणूक निकालांच्या अचूक अंदाजांसाठी प्रसिद्ध असलेल्या राजस्थानमधील फलोदी सट्टा बाजारानेही या निवडणुकीत आम आदमी पक्षाचे नुकसान होण्याची शक्यता असल्याचे म्हटल्याचे आहे. या निवडणुकीत दिल्लीची सत्ता कोण काबीज करणार याकडेच आता सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.**

# बहुपिकातून विविध कडधान्यांबरोबर सूर्यफुलाचे उत्पादन




**खबरबात**
**महेश शिंदे**

एकीकडे कोकणा मध्ये भात शेती करण्याकडे दुर्लक्ष होत असल्याने पडिक शेतीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढू लागले आहेत अशातच प्रयोगशील शेतकरी दीपक अमराळे यांनी बहुपिकाच्या माध्यमातून सूर्यफुलाचे उत्पादन घेण्यास सुरुवात केली आहे. भरलेला सूर्यफूल पाहून त्यांना भविष्यात मोठे पीक घेण्याची आशा निर्माण झाली आहे.

महाड तालुक्यातील करंजखोल गावातील दीपक पांडुरंग अमराळे यांनी २००९ मध्ये दासगाव मध्ये सुमारे एक एकर पडीक जागा विकत घेतली. २००९पासून या ठिकाणी ते कृषीतील विविध प्रयोग करत आहेत. यावर्षी त्यांनी बहुपिकाच्या माध्यमातून सूर्यफुलाचे यशस्वी उत्पादन केले आहे. प्रयोग म्हणून केलेल्या या सूर्यफुलाचे दर्शन झाल्यानंतर दीपक अमराळे यांना आनंद निर्माण झाला आहे. कोकणामध्ये भाताचे पीक घेतले जाते. यामध्ये रायगड जिल्हा हा भाताचे कोठार म्हणून ओळखले जात होते मात्र आधुनिकतेच्या बदलामध्ये शेतकऱ्यांनी जमिनी विकून टाकल्या. तर तरुण पिढी मोठ्या प्रमाणावर स्थलांतरित झाल्याने परिस्थितीचे प्रमाण देखील वाढले आहे. या पडीक शेतीमुळे कृषी क्षेत्राचे उत्पादन देखील घटू लागले आहे. आपल्या लाल मातीत देखील विविध प्रयोग करून उत्पादन घेता येऊ शकते ही आशा बाळगून दीपक अमराळे यांनी एक एकर मध्ये विविध कडधान्य आणि भाजीपाला यांची लागवड करण्यास सुरुवात केली. यामध्ये त्यांनी वाल, मटकी, चवळी, तीळ, सूर्यफूल, उडीद, ज्वारी, मका अशी विविध बीज पेरून शेती करण्याचा प्रयोग केला. यामध्ये त्यांना यश मिळू लागले आहे.

दीपक अमराळे यांनी याच शेतामध्ये ज्वारीचे उत्पादन देखील घेतले होते. या ज्वारीतून त्यांनी स्वतःसाठी काही प्रमाणात ज्वारी ठेवून उर्वरित ज्वारी विक्री केली. या विक्रीतून त्यांना चांगल्या प्रकारे नफा देखील मिळाला असल्याचे दीपक अमराळे यांनी सांगितले. माणसाने नेहमी प्रयोगशील राहून आपल्याच शेतामध्ये विविध प्रयोग करत राहिल्यास कृषी क्षेत्रातून नक्कीच फायदा होतो असे सांगितले. पावसाळ्यामध्ये नाचणी, भात आणि भुईमूग हे पीक देखील त्यांनी घेतल्याचे आवर्जून सांगितलं. कोकणामध्ये पावसाळ्यात केवळ भात शेती करून उर्वरित महिन्यांमध्ये भात शेती पडून राहते. या शेत जमिनीत भात कापणी झाल्यानंतर मातीमध्ये बऱ्यापैकी ओलावा टिकून राहतो. या दल दल असलेल्या जमिनीमधून वाटेल ते पीक घेता येते. विना पाण्याच्या आधारे दीपक अमराळे यांनी सूर्यफूल, वाल, मटकी, चवळी, तीळ हे पिकवले आहे. सूर्यफुलाला उत्तम दर्जाची फुले देखील आल्याचे पाहून त्यांनी केलेल्या कष्टाचे समाधान व्यक्त केले आहे. बहु पिकामध्ये उंच वाढणाऱ्या पिकाच्या बुंध्याशी इतर वेलवर्गीय कडधान्य, भाजीपाला लावल्यानंतर एका शेतामध्ये अनेक पीक घेण्याची संकल्पना पूर्ण करता येते. या मातीमध्ये काहीच होत नाही असं म्हणणं योग्य नाही यातूनच उत्पन्न मिळवून स्थलांतर रोखता येणे शक्य आहे असे दीपक अमराळे यांनी सांगितले.

# स्वरभास्कर, भारतरत्न गायक पंडित भीमसेन जोशी




जन्म ४ फेब्रुवारी १९२२ कर्नाटक येथील गदग याठिकाणी झाला. भीमसेनजींचे वडील पेशाने शिक्षक होते. त्यामुळे भीमसेनजींचा संगीताकडे असणारा कल त्यांना आवडत नसे. त्यामुळे कालांतरानेआपली आवड जोपासण्यासाठी घर सोडावे लागले. त्यांनी पुढे उत्तर भारतात जाऊन उस्ताद अब्दुल करीमखाँ, वझेबुवा, केसरबाई केरकर या सारख्या अन्य उस्तादांकडे त्यांनी गायन-वादन शिकून घेतले. घरी आल्यानंतर त्यांच्या वडीलानी संगीताचा ओढा लक्षात घेऊन कुंदगोळ गावातील रामभाऊ कुंदगोळ यांच्याकडे शिकवणी चालू केली. रामभाऊ सवाई गंधर्व होते. त्यामुळे शास्त्रीय संगीत शिकवण्याकडे अधिक भर होता. पुढे त्यांनी लवकरच पुण्यातील हिराबागेत आपली पहिली संगीत मैफिल भरवली. विमान प्रवासांमुळे, त्यांना पु.ल. देशपांडे यांनी गमतीने 'हवाईगंधर्व' ही पदवी बहाल केली होती. कित्येक वेळा एकाच दिवसात दोन शहरांतील मैफली घेण्यासाठी ते दोनदा विमानप्रवास करीत असत. भीमसेन जोशींना हिंदुस्थानी शास्त्रीय गायन पद्धतीचे ख्याल गायक म्हणत असले तरी त्यांनी १९४० च्या दशकात लखनौ मध्ये एक वर्ष राहून तेथील प्रसिद्ध गायकांकडून ठुमरी शिकून घेतली होती.


आपल्या गुरूच्या स्मरणार्थ त्यांनी १९५२ सालापासून सवाई गंधर्व संगीत महोत्सव सुरु केला होता. भीमसेन जोशींना प्रत्येक गायनाचा प्रकार आवडायचा. त्यामुळे जयपूर येथील गंधर्व महाविद्यालयाने संगीताचार्य हि पदवी बहाल केली भारतात शास्त्रीय गायनाच्या हिंदुस्थानी आणि कर्नाटकी या दोन प्रमुख शाखा मानल्या जातात. भीमसेन जोशींचे वैशिष्ट्य असे की ते दक्षिण भारत प्रचलित असलेल्या कर्नाटकी गायनातल्या चीजा हिंदुस्थानी पद्धतीने गाऊन दाखवीत. त्यामुळे त्यांचे गायन कर्नाटकी संगीताची परंपरा असलेल्या दक्षिणी भारतातही, विशेषतः तरुण पिढीमध्ये लोकप्रिय झाले. वसंत बहार नंतर भीमसेनजींनी पुन्हा एकदा हिंदीत ठसा उमटवण्यासाठी अमोल पालेकर यांच्या अनकही चित्रपटातून ते झळकले. १९८४ मध्ये आलेल्या या चित्रपटात दोन भजने गाण्यासाठी पंडितजींना बोलावण्यात आले. परंतु त्या आधी हे निश्चित नसताना अमोल पालेकर आणि संगीतकार जयदेव यांच्यात कोण्या गायकांकडून गावीत, हे चालू असताना जयदेव म्हणाले या भूमिकेसाठी विचार करता या गाण्यांना भीमसेन जोशी यांच्यासारखाच गायक हवा. भीमसेन जोशी यांच्यासारखा हवा तर भीमसेन जोशींचं का नकोत? त्याच वेळी पालेकरांनी पंडितजींना फोन लावला, व त्यांनी दुसऱ्या दिवशी विमान तळावर भेटण्याचे सांगितले.दुसऱ्या दिवशी त्यांची भेट झाली. त्या दोघांनी वाहनांमध्येच बोलायला सुरवात केली. पालेकर म्हणाले अनकही नावाचा सिनेमा करतोय, त्यासाठी दोन भजन आपण गावीत. हे ऐकून पंडितजींनी लगेचच होकार दिला. पालेकर यांच्या सोबत असलेले संगीतकार जयदेव देखील त्यावेळी भावनाशील झाले होते.

पंडितजीनी आपल्या आयुष्यात सर्वात जास्त प्रेम केलं असेल तर ते फक्त गायनावर. त्यांनी विविध संगीत मैफिलीतून संगीताला चालना दिली. त्यांनी केलेल्या संगीतसेवेमुळे भारतीय शास्त्रीय संगीतात पंडित भीमसेन जोशींचे स्थान अजरामर झाले आहे. महाराष्ट्र सरकार दरवर्षी भीमसेन जोशी यांच्या नावाचा 'भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत जीवनगौरव पुरस्कार देते.

आतापर्यंत हा पुरस्कार किशोरी आमोणकर, पंडित जसराज यांना मिळाला आहे.या महान गायकाचे २४ जानेवारी २०११ रोजी पुणे येथे वयाच्या ८८व्या वर्षी देहावसान झाले.

**-गोकुळ पवार**





## बदलते तंत्रज्ञान

# जीमेलचा पासवर्ड विसरला? 'या' ट्रिकने पुन्हा मिळवा



आजच्या डिजिटल युगात जीमेल हा आपल्या जीवनाचा एक महत्त्वाचा भाग बनला आहे. Google Drive, Google Photos आणि YouTube सारख्या अनेक महत्त्वाच्या प्सवर ईमेल पाठवण्यापासून ते फक्त Gmail खात्याद्वारेच ॲक्सेस उपलब्ध आहे. पण तुम्ही तुमचा जीमेल पासवर्ड विसरला असाल तर घाबरण्याची गरज नाही. काही सोप्या स्टेप्स फॉलो करून तुम्ही तुमच्या Gmail अकाउंटमध्ये काही मिनिटांत पुन्हा प्रवेश करू शकता.तुम्ही तुमचा Gmail पासवर्ड विसरला असल्यास, तो रीसेट करण्यासाठीपासवर्ड रिकव्हरी पेजवर जा. सर्व प्रथम आपल्या ब्राउझरमध्ये Google Account Recovery Page उघडा. येथे तुम्हाला तुमचा Gmail ॲड्रेस टाकावा लागेल आणि Next बटणावर क्लिक करावे लागेल.

जुन्या पासवर्डने व्हेरिफाय करा : Google प्रथम तुम्हाला तुमचा पूर्वीचा पासवर्ड विचारेल. आपल्याला आठवत असल्यास, तो टाका आणि छ्ुीं क्लिक करा. तुम्हाला जुना पासवर्ड आठवत नसेल, तर Try another way हा पर्याय निवडा.

OTPसह खाते व्हेरिफाय करा Google तुमच्या खात्याशी लिंक केलेल्या मोबाइल नंबरवर OTP (वन-टाइम पासवर्ड) पाठवेल. मोबाईल नंबरवर प्राप्त झालेला OTP एंटर करा आणि Next बटण दाबा.

**बॅकअप ई-मेल किंवा सुरक्षा प्रश्न**

तुम्हाला तुमच्या मोबाईल नंबरवर Google तुमच्या बॅकअप ई-मेलवर पडताळणी लिंक पाठवू शकते. काही प्रकरणांमध्ये तुम्हाला सुरक्षा प्रश्नांची उत्तरे देण्याचा पर्यायदेखील मिळू शकतो.

**नवीन पासवर्ड सेट करा**

पडताळणी केल्यानंतर, तुम्हाला नवीन पासवर्ड तयार करण्याचा पर्याय मिळेल. एक नवीन पासवर्ड निवडा जो मजबूत असेल आणि जो तुम्ही सहज लक्षात ठेवू शकता. पुष्टी करा बटणावर क्लिक केल्यानंतर तुमचा पासवर्ड रीसेट केला जाईल. पासवर्ड लक्षात राहण्यासाठी तुमचा पासवर्ड नोटबुकमध्ये लिहून सुरक्षित ठेवा. वेळोवेळी तो बदलत राहा.

# जागतिक कर्करोग दिन



**निमित्त**

जागतिक कर्करोग दिन दरवर्षी ४ फेब्रुवारी रोजी साजरा केला जातो. लोकांमध्ये या जीवघेण्या आजाराबाबत जनजागृती व्हावी हा त्यामागचा उद्देश आहे. या दिवशी लोकांना कॅन्सरविषयी माहिती देणे, त्याची लक्षणे ओळखणे, त्यावर लवकरात लवकर उपचार करून घेणे आणि प्रतिबंध करण्याचे उपाय केले जातात. जर लोकांना या आजाराशी संबंधित सर्व महत्त्वाच्या गोष्टींची माहिती असेल, तर या आजारापासून बचाव करण्यात मोठी मदत होऊ शकते.

दरवर्षी जागतिक कर्करोग दिनासाठी एक थीम निवडली जाते. जागतिक कर्करोग दिन २०२५-२०२७ ची थीम युनायटेड बाय युनिक आहे, जी लोक-केंद्रित कर्करोग काळजीचे विविध आयाम आणि फरक करण्याच्या नवीन मार्गांचा शोध घेईल . जागरूकता वाढवण्यापासून ते कृती करण्यापर्यंतच्या तीन वर्षांच्या प्रवासाचा उद्देश एक सामूहिक कथा तयार करणे आहे .युनायटेड बाय युनिक' हे घोषवाक्य हे अधोरेखित करते की लोकांच्या अनन्य कथा, गरजा, दृष्टीकोन आणि परिस्थिती आहेत ज्यांना काळजी आणि आरोग्य प्रणाली तयार करताना विचारात घेणे आवश्यक आहे, तर समुदाय आणि कर्करोगाचा अनुभव असलेले प्रत्येकजण त्यांच्या उद्दिष्टात एकजूट आहे. कर्करोगाविरूद्ध कारवाई करण्यासाठी.

४ फेब्रुवारी २००० रोजी फ्रान्समध्ये वर्ल्ड कॅन्सर कौन्सिल फॉर द न्यू मिलेनियम कर्करोगाची परिषद झाली. त्यावेळी युनेस्कोचे तत्कालीन महासंचालक कोइचिरो मत्सुरा आणि फ्रान्सचे माजी राष्ट्राध्यक्ष जॅक शिराक यांनी कॅन्सरविरुद्ध पॅरिसच्या सनदावर स्वाक्षरी केली होती. तेव्हापासून हा दिवस दरवर्षी 'जागतिक कर्करोग दिन' म्हणून साजरा केला जातो.

कॅन्सर हा असा आजार आहे ज्याला कोणीही हलक्यात घेत नाही. ही अशी स्थिती आहे ज्यामुळे मानवी शरीरातील काही स्नायू नियंत्रणाबाहेर जातात आणि शरीराच्या इतर भागात पसरतात. कर्करोग मानवी शरीरात कुठेही विकसित होऊ शकतो. प्राणघातक रोगाची चिन्हे आणि लक्षणे प्रगत अवस्थेपर्यंत दिसून येत नाहीत, त्यामुळे सुरुवातीच्या टप्प्यात त्याकडे दुर्लक्ष केले जाते. कर्करोग कदाचित भितीदायक वाटेल, परंतु त्याबद्दल स्वतःला शिक्षित करणे हा सर्वोत्तम उपाय आहे. कर्करोगावर अद्याप कोणताही इलाज नाही, परंतु आपण त्याच्या प्रतिबंध, संशोधन आणि उपचारांबद्दल आपले ज्ञान नक्कीच वाढवू शकतो.

शरीरातील गुणसूत्र बदलांमुळे असामान्यपणे वाढणारे स्नायू गट आणि त्यामुळे होणारा रोग म्हणजे कर्करोग. हिप्पोक्रेट्स या ग्रीक विचारवंताने प्रथम ३७० इसवीसन पूर्व जगाला जागरुकता आणली. तेव्हापासून कर्करोगाने मानवाची पाठ सोडलेली. सुमारे ३५०० वर्षांपासून मानवाने कर्करोग समजून घेण्यासाठी, निदान आणि उपचार पद्धती शोधण्यासाठी संघर्ष केला आहे आणि तो अजूनही चालू आहे.

**बातमीतील बात**




# आरोग्य प्रहर

## रामफळाचा शरीराला नेमका काय फायदा मिळू शकतो?



फळे खाणे आरोग्यासाठी खूप गरजेचे असते. त्यामुळे सहसा आपण सफरचंद, संत्री, मोसंबी, चिकू या फळांचे सेवन करतो. पण, बाजारात मिळणारी इतर फळेसुद्धा आवर्जून खायला हवीत. त्यातील एक म्हणजे रामफळ. रामफळ, ज्याला नेटेड कस्टर्ड पल किंवा वाइल्ड मिठाई म्हणूनदेखील ओळखले जाते. हे उष्णकटिबंधीय, हृदयाच्या आकाराचे फळ आहे ज्याची त्वचा हिरवी-पिवळी तर चवीला थोडे तिखट आणि गोड असते. फळाचा आतला भाग पांढरा आणि मलाईदार आहे, तर तुम्ही रोज रामफळाचे सेवन केले तर काय होईल? तुम्ही रोजच्या आहारात त्याचा समावेश केला तर तुम्हाला कोणते फायदे मिळतील? मधुमेही रामफळाचे सेवन करू शकतात का? याबद्दल जाणून घेण्यासाठी द इंडियन एक्स्प्रेसने तज्ज्ञांशी चर्चा केली.

चेन्नई येथील द क्लेफ्ट अँड क्रॅनिओफेशियल सेंटर आणि श्री बालाजी मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटलच्या, आहारतज्ज्ञ दीपलक्ष्मी यांच्या मते, रामफळाचे दररोज सेवन केले जाऊ शकते. कारण या फळात व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन बी ६ सारखी पोषक तत्वे आणि पोटॅशियम, मॅग्नेशियम आणि फायबरसारखी खनिजे असतात. रामफळातील व्हिटॅमिन सी कंटेंट रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यास योगदान, तर आहारातील फायबर नियमित आतड्यांच्या हालचालींना प्रोत्साहन देऊन नियमित पचन होण्यास मदत करतात. रामफळात असणारे अँटिऑक्सिडंट्स ऑक्सिडेटिव्ह नुकसानापासून पेशींचे संरक्षण करण्यास मदत करू शकते, तर पोटॅशियम रक्तदाब नियंत्रित करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते, जे हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी आरोग्यासाठी फायदेशीर असतात.

रामफळ खाणे मधुमेहींसाठी योग्य ठरेल का?

आहारतज्ज्ञ दीपलक्ष्मी यांनी सांगितले की, या फळाचा ग्लायसेमिक इंडेक्स साधारणतः कमी ते मध्यम प्रमाणात म्हणजे ५४ टक्के आहे, त्यामुळे मधुमेह असलेल्या व्यक्ती सामान्यतः हे फळ खाऊ शकतात, पण अगदी कमी प्रमाणात. या फळाचा ग्लायसेमिक इंडेक्स कमी असल्यामुळे रक्तातील साखरेची पातळी वेगाने वाढत नाही. पण, रामफळाचे जास्त सेवन केल्यावर मधुमेह असलेल्या व्यक्तींनी त्यांच्या रक्तातील साखरेच्या पातळीचे निरीक्षण करणे महत्त्वाचे आहे.

रामफळ अनेक आरोग्य फायदे देत असले तरीही संतुलित आहाराचा भाग म्हणून त्याचे सेवन करणे आवश्यक आहे. कारण रामफळाचे जास्त प्रमाणात सेवन केल्याने पाचन समस्या किंवा पोषक तत्वांचे असंतुलन होऊ शकते.

# अलिबागचा पांढरा कांदा बाजारात दाखल

**अलिबाग : प्रतिनिधी**

औषधी गुणधर्म असलेला अलिबागचा पांढरा कांदा जानेवारी महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात विक्रिसाठी बाजारात येतो. परंतु यंदा अवकाळी पावसामुळे पांढर्या कांद्यासाठी ग्राहकांना थोडी प्रतिक्षा करावी लागली. अलिबागचा हा पांढरा कांदा आता विक्रीसाठी बाजारात येऊ लागला आहे. लहान कांदा २०० रुपये माळ तर मोठा कांदा २५० रुपये माळ अश्या दराने सध्या हा कांदा विकला जात आहे.

रायगड जिल्ह्यात खरीप हंगामात भात पिकाची मोठ्या प्रमाणात लागवड होत असते मात्र रब्बी हंगामात सिंचन क्षेत्र वगळता फारशी पिक घेतली जात नाही. जिल्ह्यात ओलिताखालील क्षेत्र फारसे नसल्याने दुबार शेती फारशी केली जात नाही. पण अलिबाग तालुका त्याला अपवाद ठरतो. अलिबाग तालुक्यातील प्रामुख्याने नेहुली , खंडाळे, कार्ले, तळवली या गावांमध्ये पांढर्या कांद्याचे पिक घेतले जात असे. त्यानंतर आलिबाग तालुक्यात इतरही गावांमध्ये पांढर्या कांद्याची लागवड शेतकरी करू लागले.

भात कापणीनंतर जमिनीतील ओलावा दोन महिने टिकत असल्याने अलिबाग तालुक्यात पांढराकांदा यासारख्या पिकांची लागवड केली जाते. ज्यातून चांगले उत्पन्न शेतकर्यांना मिळते. यंदा पाउस उशिरा पर्यंत पडल्याने पाणी मुबलक होते. पांढर्या कांद्याचा आकार मोठा असेल. त्यामुळे शेतकर्यांच्या उत्पन्नात वाढ होणार आहे.

पांढर्या कांद्यांच्या काढण्याचे काम सध्या वेगात सुरू आहे. वाळलेल्या कांद्याच्या वेण्या बनवण्याचे काम सुरू झाले आहे. यातून महिलांना मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होत आहे. व्यापारी शेतकर्यांच्या बांधावर येवून कांद्याची उचल करीत आहेत आणि नवीन कांद्याला चांगला भावदेखील मिळतो आहे.सध्या लहान कांदा २०० रुपये माळ तर मोठा कांदा २५० रुपये माळ या दराने पांढरा कांदा विकला जात आहे. सुरवातीच्या हंगामात कांद्याचे दर चढे राहतील, नंतर आवक वाढल्यावर हे दर कमी होतील अशी अपेक्षा आहे.

औषधी गुणधर्मामुळे अलिबागच्या पांढर्या कांद्याला बाजारात मोठी मागणी आहे. परंतु सध्या केवळ २५० हेक्टर क्षेत्रावर याची लागवड होते. हे क्षेत्र वाढवण्यासाठी बियाण्यांचा कमतरतेचा अडसर येतो आहे. हे क्षेत्र वाढवण्यासाठी रायगड जिल्हा प्रशासनाचे प्रयत्न सुरू आहेत. स्वतः जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी पुढाकार घेतला आहे. जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून बीजोत्पादनाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे.



**भौगोलिक मानांकन मिळाल्याने पांढर्या कांद्याला मागणी वाढली आहे. मुंबई, पुण्यासारख्या महानगरातून कांद्यासाठी मोठी मागणी केली जात आहे. यंदा हवामान चांगले होते. त्यामुळे पीकही जोमाने आले आहे. येत्या काही दिवसात कांदा बाजारात मुबलक प्रमाणात दाखल होईल. –सतीश म्हात्रे, शेतकरी**

# नेरळ येथील स्विमिंग पुलमध्ये बुडून लहानग्याचा मृत्यू

**नेरळ : प्रतिनिधी**

नेरळ पूर्व परिसरात बदलापूर येथून आलेल्या चार वर्षीय चिमुरड्याचा स्विमिंग पुलमध्ये पडून दुर्देवी मृत्यू झाला आहे.आयांश अभिजित निवाळकर असे मृत झालेल्या चार वर्षीय मुलाचे नाव असून तो आपल्या आई सोबत फिरण्यासाठी म्हणून नेरळ येथे आला होता.दरम्यान सायंकाळी चार वाजण्याच्या सुमारास आयांश हा आपल्या आईचे लक्ष चुकवून हा स्विमिंग पुलाजवळ गेला असता पाण्यात बुडून मृत्यू झाला.

बदलापूर वेस्ट जवळील शनिमंदिर परिसरातील मनोहर निवास इमारतीत राहणारे निवाळकर ह्या आपला चार वर्षीय आयांशला घेउन फिरण्यासाठी म्हणून मैत्रिणीसोबत शनिवार सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास नेरळ येथे आले होते. निवाळकर आणि त्यांच्या मैत्रिणी ह्या नेरळ जवळील कोल्हारे ग्रामपंचायत हद्दीतील आशीर्वाद व्हीला या फार्महाऊससवरील बंगल्यात वस्तीला राहिले होते.त्यांच्या सोबत त्यांची लहान मुले देखील होती.दुपारचे जेवण करून ह्या महिला बंगल्याच्या टेरेसवर गप्पागोष्टी करण्यासाठी म्हणून बसले असताना लहान मुले बाजूला खेळत होती.यावेळी निवाळकर यांचा चार वर्षीय मुलगा आयांश अभिजित हा आईची नजर चुकवत बंगल्या मध्ये असणार्‍या स्विमिंग पूल जवळ गेला असता तो पाण्यात पडला. ही घटना सायंकाळी चार वाजण्याच्या सुमारास घडली जवळजवळ १५ मिनीटे हा मुलगा पाण्यात पडून होता.मुलगा कुठे दिसून येत नसल्याने निवाळकर हे मुलाला शोधत होत्या दरम्यान मुलगा स्विमिंग पुलच्या पाण्यात पडल्याचे दिसून आल्याने आईने एकाच टाहो फोडला.पाण्यात बुडाल्याने मुलाचा गुदमरून मृत्यू झाल्याचे नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्रातील उपस्थित डॉक्टरांनी या वेळी सांगितले.

एकूणच स्विमिंग पूल परिसरात कुठलेही सुरक्षा फार्महाऊस मालकाने ठेवलेली नसल्याचे समोर आले आहे.तर निवाळकर कुटुंबात ९ वर्षाने मुलगा जन्माला आला होता म्हणून माहिती समोर आलेली आहे.यावेळी नेरळ पोलीस घटनास्थळी दाखल झाले होते.याबाबत अधिक तपास नेरळ पोलीस करीत आहेत.


![MAHATRANSCO]

**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**EXTENSION TO SRM E-TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender** Specification.

| | |
|---|---|
| Tender No. : E-Tender -01/ 2025-26<br>**Name of Tender :** Extension to E-Tender for providing daily sweeping / cleaning services alongwith cleaning materials at office, godown & yard area of Major Stores, Panvel for the period 01.04.2025 to 31.03.2026.<br>**Tender Fee :- Rs. 500 /- + applicable GST**<br>**RFx No.- 7000034949** | **Online Downloading the RFx :** Dt.04.02.2025, 00:00 Hrs. to 13.02.2025, 23:59 Hrs.<br>**Online Submission of the RFx :** On or Before Dt. 13.02.2025, 23:59 Hrs.<br>**Online Opening of the Techno Commercial RFx :** Dt. 14.02.2025, at 10:00 Hrs. (If possible ).<br>**Online Opening of the Price bid :** Dt. 14.02.2025 at 15:00 Hrs. (If possible) |

For further details visit our website :-**https://srmetender.mahatransco.in**
Contact Person: - The Executive Engineer, Mobile No. 8275215120
**Note :** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**Sd/-**
**Executive Engineer, Major Stores, Panvel**


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही **संगिता बाळा पाटील वगैरे** रा. भिंगार, ता. पनवेल, जि. रायगड यांच्या प्रत्यक्ष मालकी व ताबे वहिवाटीची मिळकत असून, सदरील विद्यमान मालकांनी सदरील मिळकत आमचे अशिलांना विकण्याचे मान्य व कबुल केले आहे. तसेच त्यांनी सदर मिळकत ही पुर्णतः निर्वेध व निर्जोखिम असून, त्यांना सदरील मिळकत विकण्याचा, पुर्ण हक्क व अधिकार असल्याचा भरवसा त्यांनी आमचे अशिलांना दिला आहे. सबब सदर मिळकतीशी अन्य कोणाचाही कसलाही करार, मदार, गहाण, दान, लिज, लिन, पोटगी इ. अगर कोणत्याही प्रकारचा हक्क व अधिकार अगर कोणत्याही प्रकारचे महसुली अगर दिवाणी दावे प्रलंबित असल्यास, प्रस्तुत नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांत आमचे खालील पत्त्यावर मुळ कागदपत्रे दाखवून आमची खात्री पटवून द्यावी. उपरोक्त मुदतीत हरकत न आल्यास, सदरील मिळकत ही पुर्णतः निर्वेध, निर्जोखीम व निष्कर्जी असून विद्यमान मालकांस तिचे पूर्ण मार्केटेबल टायटल आहे, तसेच अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा काही एक हक्क, अधिकार व हितसंबंध नाही व असल्यास तो त्यांनी जाणीवपुर्वक सोडून दिलेला आहे. असे समजुन आमचे अशिल पुढील व्यवहार पुर्ण करतील. मुदतीनंतर कोणाचाही कसलीही हरकत / तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन (परिशिष्ट)**
**मौजे – भिंगारवाडी, ता. पनवेल, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| अ. क्र. | गट क्र. व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | मालकाचे नांव |
|---|---|---|---|
| १ | ७६/२ | ०–६४–२० | १. संगिता बाळा पाटील<br>२. लता नरेश केणी<br>३. अंजु नंदकुमार पाटील<br>४. हर्षला हेमंत म्हात्रे<br>५. जुईली जितेंद्र पाटील<br>६. विद्या देवेंद्र पाटील<br>७. जान्हवी देवेंद्र पाटील<br>८. कवीराज देवेंद्र पाटील<br>नं. ७ व ८ यांचे अपाक आई<br>नं. ६ विद्या देवेंद्र पाटील. |

येणे प्रमाणे नोटीस दिली.
पनवेल.
दिनांक :– ०३/०२/२०२५.

सही/–
**ॲड. एस. के. राणे.**

पत्ता – शॉप नं. १२३, नगरपालिका कॉम्प्लेक्स, भाजी मार्केटजवळ, पनवेल – ४१०२०६, जि. रायगड. मो.नं. ९८१९८६९२१२

## रायगड जिल्हा परिषद, अलिबाग
### सामान्य प्रशासन विभाग
**–: दरपत्रक सूचना :–**

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र) रायगड जिल्हा परिषद, अलिबाग, हे जिल्हा परिषद रायगड मुख्यालय व पंचायत समिती स्तरावरील अधिनस्त सर्व कार्यालयाकडील कालबाहय अभिलेखाची (ड पत्र ) फाडुन विक्री करणे या कामासाठी पुरवठादारांकडून मोहरबंद दरपत्रक मागवित आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | प्रमाण प्रति किलो दर | दर |
|---|---|---|---|
| १ | जिल्हा परिषद रायगड मुख्यालय व पंचायत समिती स्तरावरील अधिनस्त सर्व कार्यालया कडील कालबाहय अभिलेखाची फाडुन विक्री करणे | रद्दी पेपर प्रति किलो दर | प्राप्त मंजूर दरपत्रका प्रमाणे |

| दरपत्रक सादर करण्याची अंतिम दिनांक, वेळ | दरपत्रक सादर करण्याचे ठिकाण | दरपत्रक उघडण्याचा अंतिम दिनांक,वेळ व ठिकाण |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| दि.१०/०२/२०२५ दुपारी ३.०० वा. | राजिप प्रशासकिय इमारत कुंटेबाग सामान्य प्रशासन विभाग, पहिला मजला मु.पो.ता. अलिबाग, जिल्हा–रायगड | मंजूर आदेशानुसार कळविण्यात येईल. |

**सदर निविदेच्या अटी आणि शर्ती कार्यालयीन वेळेत उक्त २ कडील ठिकाणी पाहण्यास मिळतील.**

मा. मुकाअ यांच्या मान्यतेने
जा.क्र. राजिप/साप्रवि/भांडार/लेखा–२/१४६/२०२५
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग
दिनांक – ०३/०२/२०२५

**सही/–**
**(जालिंदर पठारे)**
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र)
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी १. श्रीमती. इंदुबाई आत्माराम पाटील, २. श्री. शरद आत्माराम पाटील, ३. श्री. निलेश आत्माराम पाटील ४. श्री. सुरेश आत्माराम पाटील, ५. श्रीमती. पुष्पा अंकुश सुरते सर्व राहणार ओवळे, ता. पनवेल, जि. रायगड यांचे नावे मौजे पुष्पक नगर सेक्टर ३, ता. पनवेल, जि. रायगड येथिल मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | सेक्टर नं. | भुखंड (प्लॉट नं.) | क्षेत्र |
|---|---|---|---|
| पुष्पक दापोली | ३ | १९५ | ७० चौ. मी |

सदर मिळकत सिडको महामंडळ कडून लीज वर मिळालेली मिळकत असून सदरचा भुखंडा मधील लिजचे अधिकार त्यांचे कडून आमचे आशिलांनी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकत खरेदीबाबत आमचे अशिलांची विद्यमान मालकांचेसोबत व्यवहार ठरविला असून सदर मिळकत कायमस्वरुपी त्रिपक्षीय करारावद्वारे खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. सदर मिळकत निर्वेध, बोजाविरहीत असून सदर मिळकत कोणासही दान, गहाण, फरोक्त, बक्षिस, लिजवर, खरेदीखताने कोणासही दिलेली नसल्याबाबत विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना कळविलेले आहे. तरीसुध्दा सदर मिळकतींबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारचे हक्क, हितसंबंध असल्यास वा कुणाचीही सदर मिळकतींचे विक्रीव्यवहारास हरकत, अडकाठी असल्यास ही नोटीस दैनिकात प्रसिध्द झालेपासून १५ दिवसांचे आत आमचे अशिलांस खालील नमूद पत्त्यावर लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी हरकती कळवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील याची कृपया नोंद घ्यावी.

दिनांक : ३/०२/२०२५
सदर नोटीस माझे जबाबदारीवर देत आहे.

सही/–
**ॲड. सुजित जनार्दन गावंड**

फ्लॅट नं. ३०४, प्लॉट नं. ७४, सहयाद्री निवास सि. एच. एस. एल, सेक्टर ०५, सानपाडा फोन: ८५९१९७४७३२

## पनवेल महानगरपालिका
ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२५/प्र.क्र.४९/४९/२०२५ दिनांक : ३/०२/२०२५

**Corrigendum**

**कामाचे नाव : पनवेल महानगरपालिका कार्यालयातील संगणकांकरीता** Microsoft office 2019 OR latest License **घेणेबाबत.**
जा.क्र. पमपा/मातंवि/ ३०२४/प्र.क्र.३०/६१ / २०२५.

| अ.क्र. | नमूद नाव | असे वाचावे |
|---|---|---|
| १ | पनवेल महानगरपालिका कार्यालयातील संगणकांकरीता ४०० Microsoft 365 Business Standard Licence घेणेबाबत | **पनवेल महानगरपालिका कार्यालयातील संगणकांकरीता** Microsoft office 2019 OR latest License **घेणेबाबत.** |

या निविदेबाबतची माहिती वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात येत आहे. सदरबाबतची दरपत्रके दि. ३०/०१/२०२५ ते दि.०५/०२/२०२५ रोजी दुपारी ०३.०० वाजे पर्यंत माहिती व तंत्रज्ञान विभाग, पनवेल महानगरपालिका येथे सादर करण्यात यावी. सदर कामाबाबतची विस्तृत माहिती पनवेल महानगरपालिकेच्या माहिती व तंत्रज्ञान विभागात प्राप्त होईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

**सही/–**
**कैलास बाळू गावडे**
पनवेल महानगरपालिका

## नमुना झेड
नियम १०७ पोटनियम {११(ड/०१)}

### स्थावर मालमत्तेचा ताबा घेणेबाबतचे नोटीस

ज्या अर्थी खाली सही केलेला वसुली अधिकारी **श्री. मधुकर रामचंद्र गुरव** ( म.स.का.१९६० कलम १५६ व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये ) **दिनांक.३१/०५/२०२२** रोजी मागणीची नोटीस ऋणको **श्री. महेश कमलाकर साकोस्कर** यांना देवुन नोटीस मध्ये नमुद केलेली रक्कम **रू.२०,५६,५५८/-( रूपये वीस लाख छप्पन हजार पाचशे अठ्ठावन रूपये फक्त** ) सदरची नोटीस मिळालेल्या दिनांका पासुन ऋणको यांनी रक्कम भरणा करणेस कसुर केली आहे. खाली सही करण्या-यांनी **दिनांक.१५/०६/२०२२** रोजी जप्तीची नोटीस दिली असुन पुढे निर्देशित केलेली मालमत्ता जप्त करण्यात आली आहे.

ऋणको ने रक्कम जमा करण्यास कसुर केल्यामुळे ऋणकोला या प्रमाणे नोटीस देण्यात येत आहे आणि सर्व नागरिकांना खाली निर्दिष्ठ केलेली मालमत्ता खाली सही करणायाने त्यांना महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा नियम १९६१ मधील नियम १०७{११(ड/०१)} अन्वये दिलेल्या अधिकारानुसार **दिनांक.०४/१२/२०२४** रोजी जप्त केली आहे.

विशेष करून ऋणकोला आणि सर्व नागरिकांना याव्दारे सावध करण्यात येते की सदर मालमत्ते संबधी कोणताही व्यवहार करू नये आणि व्यवहार केल्यास वसुली अधिकारी, 'पारिजात को-ऑप.क्रेडिट सोसायटी लि.' यांच्या बोज्याची रक्कम **रू.१०,९४,०७७/-** व त्यावरील व्याज याला अधिन रहावे लागेल.

**मालमत्तेचे वर्णन :**

ता.पेण, मौजे.पेण, येथील सि.स.नं.४०१, त्याचे क्षेत्र १०१.२ चौ.मी व त्या मिळकतीवर उभे असलेली तळ + पहिला मजला, नविन म्यु.घर नं.८/५३, नविन प्रॉ.पर्टी नं.डब्लू ८ झेड १००६९६४, त्याचे एकुण क्षेत्र २१७.२ चौ.मी अशी मिळकत.
एरिया :- २१७.२ चौ.मीटर
: चर्तुःसिमा :
पुर्वेस :- घर पश्चिमेस :- घर दक्षिणेस :- रोड उत्तरेस :- मोकळी जागा

जा.क्र.वसुली अधिकारी/१५६/१४००/२०२४-२५
दिनांक : ०३.०२.२०२५
ठिकाण : नेरूळ, नवी मुंबई.

सही/-
श्री. मधुकर रामचंद्र गुरव
वसुली अधिकारी
(म.स.का.१९६० कलम १५६ व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये)
द्वारा-पारिजात को-ऑप.क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई

शिक्का

## जाहीर प्रसिध्दीकरण

पुढे नमुद केलेल्या सहकारी संस्थेचे सन २०२४ ते २०२९ या कालावधीतील पंचवार्षिक निवडणूकीसाठी निवडणूक कार्यक्रम प्रसिध्द करण्यांत येत आहे. संस्थेचे नाव डॉ. जी.डी. पोळ फाऊंडेशन कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या, खारघर, ता. पनवेल, जि. रायगड., असे असून सदर कार्यक्रमानुसार नामनिर्देशन पत्र स्विकृती दि. ०५/०२/२०२५ ते ११/०२/२०२५, नामनिर्देशन पत्र छाननी दि. १२/०२/२०२५, नामनिर्देशन पत्र माघारी दि. १४/०२/२०२५ ते २८/०२/२०२५ व आवश्यकतेनुसार मतदान अनुक्रमे दिनांक ०९/०३/२०२५ रोजी घेण्यांत येईल तपशिलवार निवडणूक कार्यक्रम, निवडणूकीबाबत सूचना व अधिक माहीती तालुका सहकारी निवडणूक अधिकारी कार्यालयामध्ये पहावयास मिळेल तरी संस्थेच्या सभासदांनी याची नोंद घ्यावी.

**सही/–**
**(सुरेखा पाटील)**
निवडणूक निर्णय अधिकारी

## विशेष सर्वसाधारण सभा सूचना

महोदय,

आपणास कळविण्यात येते की, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाची विशेष सर्वसाधारण सभा शुक्रवार दिनांक २८ फेब्रुवारी २०२५ रोजी सायंकाळी ०४:०० वाजता रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, प्लॉट नं. ४७५, मार्केट यार्ड, पनवेल येथे आयोजित करण्यात आलेली आहे. या सभेस उपस्थित राहून आपण सहकार्य करावे हि विनंती.

**सभेपुढील विषय :–**
१) मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.
२) सन २०२५–२०२६ या वर्षाचे अंदाजपत्रक सादर करणे व संम्मत करणे.
३) श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या साधारण व आजीव सभासद प्रवर्गाच्या सभासदत्वासाठी आलेल्या विनंती अर्जांवर विचार विनिमय करुन निर्णय घेणे.
४) श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सुधारित घटना व नियमावली दुरुस्तीबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.
५) मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळेस आलेल्या विषयांवर चर्चा करणे.

दिनांक : ०१/०२/२०२५ आपला विश्वासू,

**सही/–**
**प्रशांत ठाकूर अध्यक्ष**
श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ

**विशेष सूचना :**
१) गणसंख्येच्या अभावी हि सभा तहकूब झाल्यास पुन्हा ती सभा त्याच जागी अर्ध्या तासानंतर वरील कामकाजासाठी भरेल. या सभेला गणसंख्येचे बंधन राहणार नाही.
२) ज्या सभासदांना अहवाल व जमा खर्चाची अधिक माहिती हवी असेल त्यांनी ती लेखी स्वरुपात संस्थेच्या कार्यालयात सभेपूर्वी सात दिवस आधी कळवावी. त्यानंतर आलेल्या प्रश्नांचा अगर सूचनांचा विचार करण्यात येणार नाही.
३) संस्थेच्या सभासदांनी त्यांचे बदललेले पत्ते संस्थेस लेखी स्वरुपात कळवावे.

## रोहा नगर परिषद
**ता. रोहा, जिल्हा रायगड, पिन कोड – ४०२१०९.**
फोन : कार्यालय – ०२१९४–२३५७३७, २३४९२०,
फॅक्स : ०२१९४–२३४०७८ email: rohanagarpalika@gmail.com

क्र. रोनप/PMAY/जाहीर सुचना/१५४७/२०२५ दिनांक :३/०२/२०२५

### प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० जाहीर सूचना

**रोहा–अष्टमी नगरपरिषद** हद्दीमधील सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० अंतर्गत नविन घरकुल नोंदणी करीता जवळील सेतू सुविधा केंद्रावर जाऊन वेब पोर्टल वर इच्छुक लाभार्थ्यांनी ऑनलाईन नोंदनी करावी.

वेब पोर्टल लिंक– https://pmaymis.gov.in/PMAYMIS2_2024 / PmayDefault.aspx

**पात्रता :–**
१. भारतामध्ये लाभार्थी तसेच कुटूंबामधील इतर सदस्यांच्या नावे पक्के मकान (घर) नसावे.
२. लाभार्थ्यांने गेल्या २० वर्षात कोणत्याही घरकुल योजनेचा लाभ घेतलेला नसावा.
३. वार्षिक उत्पन्न मर्यादा ३.०० लक्ष रूपये कमाल राहील.

**नविन घरकुल नोंदणी ऑनलाईन करण्याकरीता आवश्यक कागदपत्रे :–**
१. अर्जदाराचे आधारकार्ड (मोबाईल नबर लिंक असलेले)
२. कुटुंबातील इतर व्यक्तींचे आधारकार्ड (पती, पत्नी, १८ वर्षाखालील अविवाहित मुले/मुली)
३. बँकेचे पासबुक (आधार लिंक असलेले)
४. जात प्रमाणपत्र
५. उत्पन्नाचे चालु वर्षाचे प्रमाणपत्र
६. जागा मालकीचा पुरावा (सातबारा, खरेदीखत इ.) मतदान कार्ड
७. शिधापत्रिका
८. मतदान कार्ड
९. घरपत्रक उतारा
१०. चालू वर्षाची कर भरणा केल्याची पावती

संपूर्ण कागदपत्राच्या मुळ प्रती सह ऑनलाईन नोंदणी करून भरलेल्या अर्जासोबत सदरील कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती रोहा नगरपरिषद कार्यालयात जमा करावे. प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० योजनेमध्ये लाभ घेण्याकरीता आवाहन करण्यात येत आहे. याबाबतीत अधिक माहितीकरीता प्रधानमंत्री आवास योजना कक्ष नगरपरिषद रोहा कार्यालय येथे संपर्क साधावा.

**सही/–**
**मुख्याधिकारी**
रोहा–अष्टमी नगरपरिषद

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविणेंत येते की, माझे मालकी वारसा हक्काने बध्द असलेली जमिन मौजे – कोन, ता. पनवेल, जि. रायगड, येथील खालील वर्णन केलेली जमिन मिळकत आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | सर्व्हे नं/ हिस्सा नं | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| **मौजे कोन,** ता. पनवेल, जि. रायगड | ४८/२ | ०–३६–२ | ७.०० |
| | १७/५/ब | ०–४१–२०<br>पो.ख. ०–०२–००<br>**एकूण ०–४३–२०** | ४.०० |
| | ११२/१९ | ०–०१–७४ | ०.१९ |

वरील वर्णनाची मिळकत ऐकत्र कुटुंब कर्ता माझे वडिलांचे नावे काशिनाथ झिपर म्हात्रे, रा.कोन, पो.आजिवली, ता. पनवेल, जि. रायगड, यांचे नांवे महसूल दप्तरी नोंद असलेली जमिन आहे. आमचे एकत्र कुटुंबाचे वाटप झाले नाही. आमचे हक्क, हितसंबंध, ताबा, वापर, वहिवाट या जमिनीमध्ये आजही कायम आहे. आमचे वडिलांच्या वयाचा गैरफायदा घेवून तिऱ्हाईत इसमाने खरेदी व्यवहारापोटी ॲडव्हान्स रक्कम देवून खरेदीखत करणेचे व्यवहार करीत आहेत. तरी आमचे हक्क, हितसंबंध असताना तिऱ्हाईत इसमांनी माझे वडिल काशिनाथ झिपर म्हात्रे यांचे बरोबर कोणताही जमिन खरेदीचा व्यवहार करू नये. केले असल्यास त्वरित रद्द करावा. अन्यथा आम्हांला तुमचे विरूध्द कायदेशीर कारवाई करणे भाग पडेल. तसेच असे व्यवहार आमचेवर बंधनकारक नाहीत. जमिनीचा ताबा, मालकी आमचे वडिल देवू शकत नाही.

हे सर्व तमाम लोकांस कळावे. याबाबतीत कोणताही दावा सांगण्याचा किंवा हरकत असल्यास कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आमच्या निदर्शनास आणून दिली पाहिजे.

दिनांक : ३/०२/२०२५

सही/–
**श्री. नंदकिशोर काशिनाथ म्हात्रे**

रा.मु.कोन, ता.पनवेल, जि. रायगड मो.नं. ९६५३२२९०८०

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक ७३/२०२४-२०२५ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | तळोजा औद्योगिक क्षेत्रातील अग्निशमन केंद्राची देखभाल व दुरूस्ती.... **तळोजा अग्निशमन केंद्र परिसर, कार्यालय आणि कर्मचारी निवासस्थानांच्या विद्यमान** सांडपाणी व पाणीपुरवठा यंत्रणेची पुनर्स्थापना करणे. | ₹ ४०,०३,०५३.०० |
| २. | रोहा औद्योगिक क्षेत्रातील **पाणीपुरवठा व सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती.......** रोहा औद्योगिक क्षेत्रा**तील पाणीपुरवठा व सांडपाणी निःसारण योजनेच्या लघु दाब पॅनेलकरीता सुट्टे** भाग व किरकोळ साहित्य पुरविण्यासह वार्षिक तत्वावर दैनंदिन देखभाल व दुरूस्ती करणे. | ₹ ३२,५९,१०४.०० |
| ३. | विळे भागड औद्योगिक क्षेत्रासाठीच्या पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.... विळे भागड पाणीपुरवठा योजना व अतिरिक्त महाड औद्योगिक **क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजनेची** एक वर्षासाठी कालावधीकरीता परिचालन व देखभाल करणे. | ₹ १२,१२,५३०.०० |
| ४. | विळे- भागड, **रोहा आणि चिपळूण औद्योगिक** क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.... महाड **विभागातील विविध ठिकाणी क्लोरीनेशन प्रणालीसाठी सुरक्षा उपकरणांचा पुरवठा** करून कार्यान्वित करणे. | ₹ २८,५९,२००.०० |
| ५. | **रोहा औद्योगिक क्षेत्रातील** पाणी पुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती...... रोहा येथील **जलशुद्धीकरण** केंद्रातील क्लोरिनेटरची **वार्षिक तत्वावर सर्वसमावेषक** देखभाल व दुरूस्ती करणे. | ₹ ६,३३,३००.०० |
| ६. | रोहा औद्योगिक **क्षेत्रातील पाणीपुरवठा** व सांडपाणी **निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती...** रोहा औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजनेची बंद झालेल्या ट्रान्सफॉर्मरची दुरुस्ती, **रिवाइंडिंग** व किरकोळ दुरुस्तीसह ट्रान्सफॉर्मरचे **तेल फिल्टर करणे.** | ₹ ९,८७,०२५.०० |
| ७. | **पाताळगंगा येथील नवीन व जुन्या जलशुद्धीकरण केंद्राची** व **सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल** व दुरूस्ती..... पाताळगंगा येथील शुद्ध जलउदंचन केंद्र व सांडपाणी उदंचन केंद्राचे परिचालन करणे. | ₹ ३९,००,१६८.०० |
| ८. | विळे- भागड व महाड औद्योगिक क्षेत्रा**तील** पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... विळे- भागड येथील **शुद्ध व अशुद्ध जलउदंचन केंद्राकरीता व अतिरिक्त महाड येथील सांडपाणी उदंचन केंद्र व सामाईक** सांडपाणी प्रक्रिया केंद्रामध्ये **साहित्य हाताळणी उपकरणांचा** पुरवठा करणे. | ₹ ३९,७७,४००.०० |

उपरोक्त कामांबाबत निविदा प्रपत्र दिनांक ०५/०२/२०२५ ते दिनांक २०/०२/२०२५ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी **वरील कामांबाबत दिनांक** १०/०२/२०२५ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर **नोंदवावेत.** कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक १२/०२/२०२५ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

# मंत्री गणेश नाईक यांचा जनता दरबार

## नवी मुंबईतील नागरिकांचा अभूतपूर्व प्रतिसाद

**नवी मुंबई : बातमीदार**

लोकशाहीत राज्यकर्त्यांचे देव हे जनतेमध्ये असतात या विचाराने जनतेच्या समस्या जाणून घेण्यासाठी राज्याचे वनमंत्री आणि पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार गणेश नाईक यांनी दहा वर्षांनंतर पुन्हा जनता दरबाराची परंपरा सुरू केली. वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात सोमवारी (दि.३) झालेल्या या पहिल्याच जनता दरबाराला नागरिकांचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला.



या दरबारात ठाणे जिल्ह्यासह मुंबई, व नवी मुंबईतील शेकडो नागरिक उपस्थित होते. महापालिका, सिडको, एमआयडीसी, पोलीस, वन विभागासह विविध शासकीय खात्यांचे वरिष्ठ अधिकारीदेखील या वेळी उपस्थित होते. ४००हून अधिक नागरिकांनी आपल्या समस्या, निवेदने मांडली, त्यापैकी अनेक समस्यांचे तात्काळ निराकरण करण्यात आले, तर उर्वरित समस्या कालबद्धरित्या सोडविण्यात येणार आहेत. काही समस्या शासकीय आणि जिल्हास्तरावर बैठका घेऊन मार्गी लावण्यात येणार आहेत. सकाळी ११ वाजता सुरू झालेला हा जनता दरबार रात्री सात वाजेपर्यंत शेवटचे वृत्त हाती आले तेव्हाही सुरू होता. प्रकल्पग्रस्तांचे दैवत

स्व. दि. बा. पाटील यांचे सुपुत्र श्री. अतुल पाटील यांनी जनता दरबारात भेट घेऊन नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाशी संबंधित प्रकल्पग्रस्तांच्या समस्या मांडल्या. यावर उत्तर देताना वनमंत्री गणेश नाईक यांनी स्पष्ट आश्वासन दिले की, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे नामकरण स्वर्गीय दि.बा. पाटील असेच होईल. जेव्हा नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून व्यापारी उड्डाणे सुरू होतील, तेव्हा 'आंतरराष्ट्रीय दि. बा. पाटील विमानतळ' म्हणून उद्घोषणा केली जाईल. यासोबतच नैना प्रकल्पासंबंधी जे काही प्रश्न आहेत त्या संदर्भात मुख्यमंत्री महोदयासमवेत बैठक घेण्याच्या आश्वासन दिले.

दिव्यांगांनीही मंत्री गणेश नाईक यांची भेट घेऊन आपल्या अडचणी मांडल्या.



## पनवेल पोलीस ठाण्यात तक्रार निवारण दिवस

**पनवेल : वार्ताहर**

महाराष्ट्र शासन, क्षत्रिय कार्यालयांसाठी १०० दिवसांच्या कृती आराखडाच्या अनुषंगाने पनवेल शहर पोलीस ठाणे येथे तक्रार निवारण दिवस घेण्यात आला.

तक्रार निवारण दिनाच्या अनुषंगाने पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीतील २५ ते ३० तक्रारदार उपस्थित होते. नमूद उपस्थित तक्रारदार यांच्या तक्रारी जाणून घेऊन या तक्रारींचे निरसन करण्यात आले. या वेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्यासह सहाय्यक निरीक्षक केदार, पवार, उपनिरीक्षक कदम, सोळंके हे उपस्थित होते.

या वेळी उपस्थितांना सायबर फ्रॉड, डायल ११२, व्हॉट्सअॅप चॅनल व नवीन कायद्यांबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

## पिरकोनच्या केबीपी विद्यालयात दहावी, बारावी विद्यार्थ्यांना निरोप



**उरण : वार्ताहर**

कर्मवीर भाऊराव पाटील (केबीपी) विद्यालय पिरकोन येथे दहावी आणि बारावी विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ सोमवारी (दि.३) आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, माजी जिल्हा परिषद सदस्य भाई जीवन गावंड, प्राध्यापक ऐ.डी.पाटील, प्राध्यापक बल्लाळ मॅडम, गुरुवर्य प्रफुल वेदक, नरेश पाटील, परेश पाटील, दहागाव उपाध्यक्ष अनिरुद्ध पाटील, सुशांत माळी, खंडाळे आदी शिक्षक वर्ग स्टाफ आणि विद्यार्थी उपस्थित होते.

या कार्यक्रमावेळी डॉ. अरुणकुमार भगत, दहागाव माजी विद्यार्थी उपाध्यक्ष मुकुंद गावंड, माजी जिल्हा परिषद सदस्य जीवन गावंड ऐ.डी. पाटील, नरेश पाटील यांनी विद्यार्थांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देऊन मार्गदर्शन केले.

## अथिरा नायरचे सुयश

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

अग्रेल स्कूल ऑफ लॉ, वाशी या कॉलेजच्या अथिरा शिवशंकरन नायर हिने अग्रेल स्कूल ऑफ लॉमध्ये प्रथम क्रमांक पटकावला असून ती मुंबई विद्यापीठाची टॉपर ठरली आहे.



विशेष बाब म्हणजे भारतीय न्याय संहिता (BNSS) या नव्याने सुरू झालेल्या विषयात नायर अथिरा शिवशंकरन हिने विशेष प्राविण्य मिळवले आहे. हा विषय डॉ. अमरीश पटनिगीरे, संचालक, अग्रेल स्कूल ऑफ लॉ, वाशी यांनी शिकवला असून, त्यांच्या मार्गदर्शनामुळेच हा अभूतपूर्व शैक्षणिक मानबिंदू गाठता आला आहे. ही उल्लेखनीय कामगिरी संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्ता आणि विधी शिक्षण क्षेत्रातील योगदानाचे प्रतीक आहे.

## वाशी येथे हळदीकुंकू समारंभ

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई मनपातील भाजपच्या ज्येष्ठ माजी नगरसेविका फशीबाई भगत यांच्या पुढाकारणे वाशी, प्रभाग क्र ६५ सेक्टर ३० मध्ये रविवारी (दि.२) हळदीकुंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी विभागातील शेकडो महिला भगिनींनी उत्स्फुर्तपणे सहभागी घेतला.

गृहिणी आणि नोकरदार महिला वर्षभर आपल्या संसारात आणि कामात मग्न असतात. हळदीकुंकू सारख्या सार्वजनिक कार्यक्रमात एक दिवस आनंदाचा असे म्हणतं आपले संसारिक जबाबदारी पार पाडून महिला या क्षणाचा आनंद लुटतात, अशी भावना या वेळी ज्येष्ठ नगरसेविका फशीबाई भगत यांनी बोलताना व्यक्त केली.



या वेळी निवेदका दामिनी नलावडे यांच्या वतीने विविध खेळात आणि कार्यकामात सहभाग घेऊन महिलांनी आनंद लुटला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रभागातील विविध सोसायट्यामधील रहिवासी महिला भगिनींचे विशेष सहकार्य लाभले.

## शिरवणेतील स्वयंभू गणेश मंदिरात माघी गणेशोत्सव



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

शिरवणे येथील पुरातनकालीन स्वयंभू गणेश मंदिर येथे माघी गणेश जयंती उत्सव मोठ्या भक्तीभावाने माजी महापौर जयवंत सुतार यांच्या मार्गदर्शनाखाली साजरा करण्यात आला.

प्रारंभी, पहाटे वेदमुर्ती प्रविण जोशी (गुरुजी) यांच्या मंत्रघोषात ट्रस्टचे अध्यक्ष नामदेव ठाकुर व विश्वस्त नरेंद सुतार हस्ते श्रींच्या मुर्तीवर अभिषेक करून करण्यात आली. या वेळी श्री राधाकृष्ण प्रासादिक भजन मंडळ, कुंडेवहाळ, संदीप बुवा कडु, कुलस्वामिनी प्रासादिक भजन मंडळ, पेठ, गायीका एकता भाग्यवंत (पेठ) व श्री हनुमान प्रासादिक भजन मंडळ, शिरवणे, नंदकुमार सुतार, देवेंद्र पवार, राधाकृष्ण बालगोपाल भजन मंडळ, हरीग्राम, सुरताल भजन मंडळ, शिरवणे, गायक पवनकुमार जाधव यांची सुश्राव्य भजने दिवसभर झाली

या वेळी भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. माघी गणेशोत्सवानिमित्त सुमारे २० हजार भाविकांनी स्वयंभु गणेशाचे दर्शन घेतले, अशी माहिती ट्रस्टचे सचिव तथा भाजप नवी मुंबईचे माजी महापौर जयवंत सुतार यांनी दिली.

माघी गणेशोत्सव साजरा करण्यास ट्रस्टचे विश्वस्त प्रभाकर सुतार, दिलीप घरत, नरोत्तम भोईर, प्रकाश पवार, विनोद म्हात्रे, तुकाराम घरत तसेच गणेशभक्तांनी अथक परिश्रम घेतले.

## नवरंग साहित्य संस्कृती आणि कला मंडळाची निसर्ग सहल



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवरंग साहित्य संस्कृती आणि कला मंडळ नवी मुंबईची निसर्ग सहल नुकतच अलिबाग येथील सासवणे शिल्पसंग्रहालयात आणि किहिम चौपाटीवर गेली होती. या सहलीत शिल्पकार करमरकर यांच्या विविध शिल्पांचे अवलोकन करून माहिती घेण्यात आली. त्यानंतर किहिम चौपाटीवर अनेक जलक्रीडांचा आनंद घेण्यात आला. लगतच्या रिसॉर्टवर बैठे खेळ, कवीसंमेलन, करावेके गीत गायनाचा आनंद घेण्यात आला.

या वेळी अलिबागचे जेष्ठ पत्रकार जयपाल पाटील यांनी सर्वांना मोलाचे मार्गदर्शन केले. या सहलीत २० सभासद सहभागी झाले होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अध्यक्ष गजआनन म्हात्रे, उपाध्यक्ष अनिल मुनघाटे, सचिव घनश्याम परकाले यांनी मेहनत घेतली.

## साई येथील विद्यालयाच्या नूतन इमारतीचे लोकार्पण

**कळंबोली : बातमीदार**

शुभदा पॉलीमर्स प्रॉ. प्रा. लिमिटेड यांचे CSR फंड, प्रमोद झवेरी फाउंडेशन व शुभ स्पर्श टीम यांच्या सहकार्यातून बांधण्यात आलेल्या सार्वजनिक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यामंदिर साई, पनवेल येथील नूतन इमारतीचा उदघाटन सोहळा ३१ जानेवारीला झाला. एकूण १२ अद्ययावत वर्गखोल्या व त्यामध्ये संगणक कक्ष, अशा भव्य दिव्य इमारतीचे उदघाटन करण्यात आले.



या कार्यक्रमासाठी मालतिबेन प्रमोद झवेरी, देवांग प्रमोद झवेरी, फाल्गुनी देवांग झवेरी व परिवार, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूरचे कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे, मुकेश पत्रावाला आणि परिवार, कौशिक झवेरी आणि परिवार, केतन झवेरी व परिवार, मुकेश शहा व परिवार, विकास शहा, तेजस सुरा, शुभदा पॉलीमर्स CSR टीम, शुभ स्पर्श टीम, श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूरचे विभाग प्रमुख यु.एस. गलांडे, माजी विभाग प्रमुख आर.ए. भोजकर आर. तसेच श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे सन्मानीय पदाधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षक, सरपंच, उपसरपंच, पंचक्रोशी ग्रामस्थ, पालक व महिला बचत गट उपस्थित होते.

या वेळी स्थानिक स्कुल कमिटी चेयरमन दामोदर विठू मोकल, सर्व स्थानिक स्कुल कमिटी सदस्य, विद्यालयाचे मुख्याध्यापक शशिकांत हबळे यांनी मान्यवरांचे स्वागत केले.

ग्रामीण भागातील गोर गरीब, आदिवासी मुलांना शिक्षणाच्या उत्तम सोयी मिळाव्यात व त्यांच्या उज्वल भविष्यासाठी ही इमारत बांधण्यात आल्याचे शुभदा पॉलीमर्स प्रॉ. प्रा. लिमिटेडच्या डायरेक्टर फाल्गुनी झवेरी यांनी सांगितले.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना कौशल्यपूर्ण शिक्षणाच्या सोयी मिळाव्यात, अशी अपेक्षा अभयकुमार साळुंखे यांनी व्यक्त करून विद्यार्थी व शिक्षक कसा असावा याबाबत मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व नियोजन प्रवीण राम पाटील यांनी केले व आभार सुरेश वळवी यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विद्यालयातील शिक्षक शिक्षिका, माजी विद्यार्थी, महिला बचत गट यांनी विशेष सहकार्य केले.



**खारघर : येथील विष्णू कमलाकर भगत व जनाबाई विष्णू भगत यांच्या घरी माघी गणेशोत्सव साजरा करण्यात आला.**

### क्लिक...क्लिक...!



**अलिबाग : येथील समुद्रकिनारी पर्यटकांची नेहमीच गजबज असते. माघी गणेशोत्सवानिमित्ताने त्यात भाविकांचीही भर पडली. मावळत्या सूर्याच्या साक्षीने कुलाबा किल्ल्यातील श्री गणेश पंचायतन मंदिरातील दर्शनासाठी हजारो गणेशभक्तांनी किल्ल्याकडे कूच केली.** (छाया : शैलेश पालकर)

## रथसप्तमी म्हणजे सूर्यदेवाचा जन्मदिन

भारतीय संस्कृती सर्वांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यास शिकवते. त्या अनुषंगाने सूर्यदेवतेप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी रथसप्तमी हा सण साजरा केला जातो. हिंदु धर्म आणि भारतीय संस्कृती यांमध्ये उच्च देवतांची उपासना आणि त्यांचे विविध सण अन् उत्सव आहेत. त्याचप्रमाणे त्यांत कनिष्ठ देवतांचीही उपासना आहे. सूर्य, चंद्र, अग्नि, पवन, वरुण आणि इंद्र या प्रमुख कनिष्ठ देवता आहेत. मानवाच्या जीवनात तसेच सर्वच प्राणिमात्रांच्या जीवनात या कनिष्ठ देवतांना महत्त्वाचे स्थान आहे.

माघ मासातील (महिन्यातील) शुक्ल सप्तमीला रथसप्तमी साजरी केली जाते. या दिवसापासून सूर्य आपल्या रथात बसून प्रवास करतो. या रथाला सात घोडे असतात; म्हणून रथसप्तमी असा शब्द वापरला जातो. ज्या सूर्यामुळे अंधार नाहीसा होतो आणि चराचराला नवे तेज, नवे जीवन लाभते, त्या भास्कराची ही पूजा आहे. ही प्रकाशाची, सूर्यदेवतेची पूजा आहे. रथसप्तमी हा स्त्रिया संक्रांतीनिमित्त करत असलेल्या हळदी–कुंकवाचा शेवटचा दिवस मानला जातो.

सर्व संख्यांमध्ये 'सात' या अंकाचे महत्त्व विशेष आहे. ऋसात' या आकड्यात त्रिगुणांचे समतोल प्रमाण असण्याबरोबर सत्त्वगुणाच्या वृद्धीसाठी आवश्यक चैतन्य, आनंद इत्यादि सूक्ष्म–लहरी ग्रहण करण्याची विशेष क्षमता असते. सप्तमी या तिथीला शक्ति अन् चैतन्य यांचा सुरेख संगम झालेला असतो. या दिवशी विशिष्ट देवतेचे तत्त्व आणि शक्ति, आनंद आणि शांति यांच्या लहरी २० टक्के जास्त प्रमाणात कार्यरत असतात. रथसप्तमीच्या दिवशी निर्गुण सूर्याच्या (अतिसूक्ष्म सूर्यतत्त्वाच्या) लहरी इतर दिवसांच्या तुलनेत ३० टक्के जास्त प्रमाणात कार्यरत असतात.



'माघ शुक्ल पक्ष सप्तमीला रथसप्तमी असे म्हणतात. महर्षि कश्यप आणि देवमाता अदिती यांच्या पोटी सूर्यदेवाचा जन्म झाला, तो हा दिवस ! भगवान श्रीविष्णूचे एक रूप म्हणजेच श्री सूर्यनारायण होत. संपूर्ण विश्वाला आपल्या महातेजस्वी स्वरूपाने प्रकाशमय करणार्या सूर्यदेवांमुळे पृथ्वीवर जीवन अस्तित्वात आहे.

रथसप्तमी हा सण सूर्य उत्तरायणात मार्गक्रमण करत असल्याचे सूचक आहे. उत्तरायण म्हणजे उत्तर दिशेकडून मार्गक्रमण करणे. उत्तरायणात सूर्य उत्तर दिशेकडे कललेला असतो. 'श्री सूर्यनारायण आपला रथ उत्तर गोलार्धात वळवत आहेत', अशा स्थितीत रथसप्तमी दर्शवली जाते. रथसप्तमी हा सण शेतकर्यांसाठी सुगीचे दिवस आल्याचा आणि दक्षिण भारतात हळूहळू वाढणार्या तापमानाचा दर्शक असतो, तसेच वसंत ऋतू समीप आल्याचा सूचक असतो.

रथसप्तमीच्या दिवशी अंगणातील तुळशीकडे एका मातीच्या चुलीवर मातीच्या भांड्यात खीर शिजवली जाते आणि ती उतू जाईपर्यंत शिजवतात. त्यात ती खीर जळतेही. अशी चुलीवर जळलेली खीर प्रसादरूपात खायचा आनंद काही वेगळाच असतो. वर्षाचे सर्व दिवस काही सारखेच आनंद देणारे असत नाहीत. काही दिवस जळके अन्न खाऊनही काढावे लागले, तर त्याची सिद्धता हवी. याची आठवण करून देणारा हा सण!

सूर्याच्या उपासनेने जिवाला स्वत:मधील सूक्ष्म–तेजतत्त्व वाढवण्याची संधी असते. यासाठी जिवाने तेजतत्त्वाच्या 'ॐ' काराची उपासना करणे उपयुक्त ठरते. त्याचप्रमाणे गायत्रीमंत्र आणि सूर्याचे विविध मंत्र यांचे पुरश्चरण करणे फलदायी ठरते. सूर्योपासनेने जिवाच्या मनाची एकाग्रता वाढते. नेत्र हे तेजतत्त्वाशी निगडीत असल्याने सूर्योपासनेने (तेजतत्त्वाच्या उपासनेमुळे) जिवाला दिव्यदृष्टि प्राप्त होते.

(साभार : सनातन संस्था वेबसाईट)

# 'शिवरायांचा इतिहास जिवंत राहणे गरजेचे'

**खोपोली : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास जिवंत राहिला पाहिजे, आणि आपल्या हिंदू धर्माचे रक्षण करण्यासाठी आपण सगळ्यांनी एकत्र आले पाहिजे असे आवाहन शिवव्याख्याते हभप शिरीष महाराज मोरे यांनी केले आहे, ते आयोजित समरभूमी उंबरखिंड येथे ३६४व्या विजय दिन सोहळ्यात बोलत होते.




समरभूमी उंबरखिंड चावणी (छावनी ) येथे छत्रपती शिवाजी महाराजांनी २ फेब्रुवारी १६६१ मूठभर मावळे घेऊन कारतलब खान्याच्या मुघल सैन्यावर मोठी लढाई करीत विजय मिळवला होता, त्या विजयी लढाईची आठवन आणि त्या आठवीनींना उजाळा मिळावा यासाठी येथे दरवर्षी पंचायत समिती खालापूर, चावणी ग्रामपंचायत आणि ग्रामस्थ शिवदुर्ग मित्र मंडळाच्या वतीने येथें विजयदिन साजरा करण्यात येतो यावर्षीही मोठया उत्साहात हा विजय दिन सोहळा पार पडला.

खालापूर तालुक्यातील सह्याद्रीच्या कुशीत असलेल्या चावनी येथें छत्रपती शिवाजी महाराजांची २ फेब्रुबारी १६६१ रोजी मुठभर मावळे घेऊन कारतलब खान्याच्या सैन्यावर मोठा विजय मिळवला होता, त्या विजयी लढाईचे आठवण होण्यासाठी याठिकाणी विजयस्तंभ समरभूमी उंबरखिंड चावणी (छावनी) उभारण्यात आला आहे, त्या विजय स्तंभाचे आज पाहुण्यांचे हस्ते पूजन करून नारळ फोडून विजयस्तंभाला अभिवादन करण्यात आले, नंतर चावणी ग्रामपंचायत आणि ग्रामस्थ्यांच्या वतीने पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. शिवव्याख्याते शिरीष महाराज मोरे यांचे शिवचारित्र आधारित व्याख्यान पार पडले, आणि शिवशाहीर वैभव घरत यांचे मराठमोळे पोवाडे, शालेय विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक कार्यक्रम, मुलांचे पोवाडे आदी कार्यक्रम पार पडले.

या वेळी शिवव्याख्याते हभप शिरीष महाराज मोरे, शाहीर वैभव घरत, खालापूर वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय अवटी, वावोशी पोलीस उपनिरीक्षक अलोक खिसमतराव, खालापूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संदिप कराड, शिवसेना खालापूर तालूका प्रमुख संदेश पाटील, जेष्ठ नेते लक्ष्मण येरम, चावणीचे सरपंच बाळासाहेब आखाडे, उपसरपंच सुखदेव भोसले, सदस्य रमेश चव्हाण, सखू वाघमारे, शिवदुर्ग मित्र मंडळाचे अध्यक्ष सुनील गायकवाड, सदस्या संगीता संदीप चिंचावडे, प्राची पांडुरंग पाटील, लक्ष्मण घुटे, माजी सरपंच मारुती फाटक, गणेश चव्हाण, जयंत भवुड, गणपत चव्हाण, बाळू बुधलेकर, सामाजिक कार्यकर्ते रामचंद्र पुकळे,तलाठी भरत सावंत, संदीप चिंचावडे, हनुमंत पाटील, हरेश पाटील, हरिश्चन्द्र साळुंखे आदींसह अनेक शिवाभक्तांसह विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

# रोह्यातील सिद्धिविनायक मंदिरात माघी गणेशोत्सव

**नागोठणे : बातमीदार**

रोहा पंचायत समितीचे माजी सभापती मोतीरामशेठ तेलंगे, रोह्याच्या माजी नगराध्यक्षा रत्नप्रभा रमेश काफरे व प्रसिद्ध बांधकाम व्यावसायीक रमेश काफरे यांनी रोहा शहरातील त्रिमूर्ती नगरमध्ये २८ फेब्रुवारी १९८९ साली सिद्धीविनायक मंदिराची स्थापन केली. तदनंतर मोतीरामशेठ तेलंगे व रमेश काफरे कुटुंबियांच्या वतीने प्रत्येक वर्षी माघी गणेश उत्सव साजरा करण्यात येत असतो. त्याच अनुषंगाने सिद्धीविनायक मंदिरात अतिशय उत्साही व भक्तिमय वातावरणात माघी गणेश उत्सव साजरा करण्यात आला.

दरम्यान, या उत्सवात माजी नगराध्यक्षा रत्नप्रभा रमेश काफरे व सामाजिक कार्यकर्त्या सुजाता चेतन तेलंगे यांच्या मार्गदर्शनाखाली त्रिमूर्ती नगरमधील महिला मंडळ हिरारीने भाग घेऊन उत्सव यशस्वी करण्यासाठी मोलाची मदत करत असतात.

माघी गणेश उत्सवानिमित्त रोह्यातील त्रिमूर्ती नगरमध्ये सिद्धीविनायक मंदिरात सकाळी मुख्य पुरोहित विनायक ओक, प्रमोद फाटक, दिपक गोडबोले, नंदू धारप, प्रकाश कुंटे, संजय साने, सुरेंद्र आगरकर व नरेंद्र बापट यांनी विधिवत पुजा अर्चा करून श्री गणेशाचे अभिषेक व सहस्त्र आवर्तन हवन तसेच श्री सत्यनारायणाची महापुजा झाल्यानंतर महाआरती तदनंतर दुपारी उपस्थित असंख्य भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

दुपारी ४ ते ८ वाजेपर्यंत दर्शन सोहळा पार पडला त्यानंतर रात्री मुंबई येथील मुकेश उपाध्ये यांचा आर्केष्टा बोल मराठी मातीचे हा कार्यक्रम अतिशय रंगतदारपणे संपन्न झाल्यानंतर उस्तवाची सांगता झाली.



# उंबरखिंड येथे ३६४वा विजय दिन साजरा

**चौक : प्रतिनिधी**

२ फेब्रुवारी १६६१ रोजी उंबरखिंड येथे झालेल्या लढाईचा ३६४वा विजय दिवस चौक येथील नेताजी पालकर यांच्या जन्म स्थळापासून ते तुपगाव येथील त्यांच्या स्मारकापर्यंत विजयी मशाल रॅली काढून साजरा करण्यात आला.

युद्धात हरलेल्या मुघलांनी परत हल्ला केला तर त्यांचा बंदोबस्त करता यावा म्हणून शिवाजी राजांनी सेनापती नेतोजी पालकर यांना उंबरखिंडच्या परिसरात म्हणजेच उत्तर कोकणात ठेवले व शिवाजी राजे स्वतः दाभोळ, शृंगारपुरच्या दिशेस दक्षिण कोकणच्या मोहिमेवर गेले. हा जाज्वल्य इतिहास आजही ताजा आहे.२ फेब्रुवारी २०२५ रोजी नेताजी पालकर यांच्या जन्म गावी चौक येथे ३६४ वा विजय दिवस हा विजयदिन सोहळा नेताजी पालकर यांच्या जन्म स्थळ येथे त्यांच्या



प्रतिमेचे पूजन करून व विजयी मशाल प्रज्वलित करून केला.

छत्रपती शिवाजी महाराजांनी समरभूमी उंबरखिंड येथे कारलतलब खानाच्या असंख्य मुघल सैनिकांवर महाराजांनी मूठभर मावळे घेऊन मोठा विजय मिळवला होता, त्यांचे स्मरण आणि आठवणींना उजाळा देण्यासाठी पंचक्रोशीतील ग्रामस्थ, चौक ग्रामस्थ ग्रुप ग्रामपंचायत चौक, सिनिअर ग्रुप चौक,शाळा, सामाजिक संस्था यांच्या वतीने हा उत्सव विजयदिन म्हणून साजरा करण्यात आला.खालापूर वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार, सरपंच रितू ठोंबरे, सरपंच रवींद्र कुंभार, सिनियर ग्रुप अध्यक्ष संजय कोंडीलकर, सुरेश घाग, भारतीय जनता पक्षाचे उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे,जिल्हा परिषद सदस्य मोतीराम ठोंबरे, माजी सभापती श्याम साळवी, अँड. मिलिंद सुरावकर,उपसरपंच सुभाष पवार, ग्राम पंचायत अधिकारी एस.पी. जाधव, मंडळ अधिकारी माणिक सानप, चौकचे सपोनि. मनिष मोरे, शोभाताई देशमुख, शिवव्याख्याते प्रशांत देशमुख, मुख्याध्यापक कांबळे, पूजा हातमोडे, स्वप्नील सोनटक्के, अजिंक्य चौधरी, नयना झिंगे, वृषाली पोळेकर, कविता कोंडीलकर यांच्या सह ग्रामस्थ नागरीक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विद्यार्थी यांनी विजयी मशाल रॅली मधुंन छत्रपती शिवाजी महाराज यांच्या लढाई, आईचा गोंधळ,जागरण, ऐतिहासिक गीते, तलवारबाजी यांची प्रात्यक्षिक दाखविले. संपुर्ण चौक बाजार पेठमधून रॅली निघून तुपगाव येथिल स्मारकाजवळ सरपंच रितू ठोंबरे व तुपगाव सरपंच रवींद्र कुंभार सर्व ग्राम पंचायत सदस्य, अधिकारी, ग्रामपंचायत कर्मचारी यांनी रॅलीचे स्वागत केले.

# आमदार थोरवेंच्या हस्ते जिमचे उद्‌घाटन

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

ज्येष्ठ समाजसेवक माजी उपनगराध्यक्ष इब्राहिम पाटील यांचे सुपुत्र एस.पी. डेव्हलपरचे संचालक शहानवाज पाटील यांच्या संकल्पनेतून अॅब्ज कोअर पॅशन फॉर फिटनेस या युनिसेक्स जिमची ग्रँड ओपनिंग कर्जत-खालापूर मतदारसंघाचे आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते झाले.

या कार्यक्रमाला शुभेच्छा आशीर्वाद देण्यासाठी राजकीय, सामाजिक, क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. शारिरीक व्यायाम पध्दतीत संशोधन करून तज्ञांच्या परीक्षणानुसार जागतिक दर्जाच्या आधुनिक बनावटीचे



एक्सरसाइज उपकरणे प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली आवश्यक व्यायाम, वजन यांचे संतुलन करून योगा, झुंबा, कॅलिस्थेनिक्स क्रॉस फिट, स्वतंत्र सुरक्षित लेडीज बाथ, कार्यात्मक प्रशिक्षण, मसाज सेंटर, स्टीम रूम अशा एक न अनेक सोयी सुविधा जिम मध्ये उपलब्ध आहेत अशी माहिती जिम हेड प्रशिक्षक अरुणा भारती यांनी माध्यमांना दिली.

खोपोलीकरांच्या सेवेत सदैव अभिनव उपक्रम राबवित शहानवाज इब्राहिम पाटील मित्र परिवाराने या वेळी उपस्थित मान्यवरांचे स्वागत, सन्मान करून आभार मानले.

# शिवायन पुस्तकांचे प्रकाशन

**पेण : प्रतिनिधी**

वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमा अंतर्गत चारुदत्त चंद्रकांत चिखले लिखित छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कथा काव्यगीत स्वरूपातील शिवचरित्राचे 'शिवायन' पूर्वार्ध व 'शिवायन' उत्तरार्ध या दोन भागांतील पुस्तकांचा प्रकाशन सोहळा महात्मा गांधी वाचनालय येथील सभागृहात अतिशय दिमाखदार पद्धतीने झाला.

या वेळी कस्टम्स व इनडायरेक्ट टॅक्सेस प्रधान आयुक्त यशोधन वनगे, नरवीर तान्हाजी मालुसरे यांच्या बाराव्या वंशजा सह्याद्री कन्या डॉ. शीतल शिवराज मालुसरे, रायगड जि.प. माजी अध्यक्षा निलिमाताई पाटील, पेणच्या माजी नगराध्यक्षा प्रितम पाटील, सामाजिक कार्यकर्त्या डॉ. समीधा गांधी, महात्मा गांधी वाचनालय संस्थेच्या उपाध्यक्षा सपना पाटील, नगराध्यक्ष गुरूनाथ मांजरेकर, सहित प्रकाशन गोवाचे सागर शिंदे, शांता भावे व पेण नगरीतील वाचक व शिवप्रेमी उपस्थित होते.

या वेळी शिवायनचे लेखक व कवी चारुदत्त चिखले यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र साध्या, सोप्या व रंजक पद्धतीने, गीत रामायणासारख्या कथा व काव्यगीते या आकृतिबंधात सादर व्हावे अशी फार वर्षांपासून तीव्र इच्छा असल्याने छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र 'शिवायन' आज पुस्तकरूपाने प्रकाशित होताना आनंद व समाधान वाटत असल्याचे सांगितले. महिलांच्या सुरक्षिततेसाठी शिवरायांचा आदर्श सर्वच पातळ्यांवर अगिकारणे आवश्यक असल्याची भावनाही त्यांनी या वेळी बोलताना व्यक्त केली.

या प्रकाशन सोहळ्यात 'शिवायन' मधील काही भागांचे श्रीमती मोनीका ठाकूर यांनी अभिवाचन केले व व 'शिवायन' मधील गीते 'गीत शिवाय' या कार्यक्रमाअंतर्गत गायक संतोष पाटील यांनी अतिशय उत्कटतेने सादर केली, त्यामुळे रसिक भारावून गेले.



# निवी येथे ओपन जिमचे लोकार्पण

**धाटाव : प्रतिनिधी**

निवी येथील गणपती विसर्जन घाटावर लोकसहभाग, व्हीआरटी संस्थेमार्फत ओपन जिम पार्क उभारण्यात आले आहे. ओपन जिमचा लोकार्पण ना. आदिती तटकरे यांच्या हस्ते शुक्रवारी (दि.३१) करण्यात आले.

सरपंच अमित मोहिते, रोटरीचे अध्यक्ष राम नाकती, व्हीआरटी संस्था यांच्या संयोजनातून ग्रामस्थ मंडळ निवी, ग्रामपंचायत वरसे यांच्या विशेष सहकार्यातून ओपन जिम उभारण्यात आली आहे. लोकार्पण सोहळ्याला सरचिटणीस सुरेश मगर, माजी सरपंच नरेश पाटील, रामा म्हात्रे, व्हीआरटीचे सुशील रुळेकर, राम नाकती, दीपिका चिपळूणकर, गटविकास अधिकारी शुभदा पाटील, ग्रामस्थ अनिल बामुगडे, गणेश राऊत, दत्ता भगत, लक्ष्मण मोहिते, गुणाजी पोटफोडे, पांडुरंग चिपळूणकर ग्रामस्थ, युवक, उपस्थित होते.



सरपंच अमित मोहिते यांनी प्रास्ताविकात आतापर्यंत आम्ही अनेक कामे व्हीआरटी संस्था, लोकसहभाग धर्मदायमधून केली आहेत. ओपन जिम पार्क सुद्धा याचेच द्योतक आहे. आता गणपती घाटाचे शानदार सुशोभिकरण व्हावे अशी आपणाकडे मागणी आहे, आपण तो काम लवकरच मार्गी लावाल अशी अपेक्षा आहे अशी मागणी मोहिते यांनी ना. आदिती तटकरेंकडे केली. ना आदिती तटकरे यांनी लोकसहभाग आणि व्हीआरटी सीएसआर संस्थेमार्फत उभारण्यात आलेल्या ओपन जिम उपक्रमाचे कौतुक केले. विभागातील शेती प्रयोगाचेही कौतुक करत आता शेतीमधील मुख्यत: तरुणांचा सहभाग समाधान देणारे आहे आपल्या मातीशी असलेले अतूट नाते यातून अधोरेखीत होत आहे असे सांगत निवी येथील तरुणांच्या कृतीशील सामूहिक शेतीचीही प्रशंसा ना. आदिती तटकरे यांनी केली.

या वेळी ना अदिती तटकरे यांना सामूहिक शेतीतील मोठा कलिंगड भेट देण्यात आला. ओपन जिम लोकार्पण कार्यक्रमाला निवी, वरसे, तळाघर सर्व गावातील ग्रामस्थ, तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मेहेंदळे हायस्कूलचा सन्मान

**रोहे : प्रतिनिधी**

रायगड पोलीस आयोजित रस्ता सुरक्षा अभियान २०२५ अंतर्गत माझी शाळा सुरक्षित शाळा व स्टुडंट्स ऑफ रोड सेफ्टी सन्मान सोहळा रिलायन्स टाऊनशिप नागोठणे येथे बालगंधर्व रंगभवन सभागृहामध्ये आयोजित करण्यात आला होता.

रायगड जिल्ह्यातील ५०० शाळांचे सर्वेक्षण करण्यात आले होते व त्यामध्ये रायगड जिल्ह्यातील २८ शाळांना सुरक्षित शाळा म्हणून सन्मान करून महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांच्या प्रमुख हस्ते व रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ जी घार्गे यांच्या प्रमुख उपस्थितित सन्मानित करण्यात आले. यामध्ये रोह्याच्या १०७ वर्ष परंपरा लाभलेल्या को.ए.सो. मेहेंदळे हायस्कूलला सुरक्षित शाळा म्हणून गौरविण्यात आले.

विद्यालयाचे प्राचार्य रमेश मोसे व शिक्षक प्रतिनिधी सत्र प्रमुख नारायण पानसरे, लोहकरे, गावित उपस्थित होते. विद्यालयाचे चेअरमन गांगल साहेब सर्व शाळा सदस्य व सर्व सेवक वर्ग यांचे अभिनंदन करण्यात आले. शाळेच्या वतीने रोहा पोलीस निरीक्षक देवीदास मुपडे व जयेंद्र पेडवी, सौ.टेमकर रोहा पोलीस ठाणे व रायगड पोलीस विभाग यांचे आभार मानण्यात आले आहे.



# माणगाव ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेतर्फे हळदीकुंकू उत्साहात

**माणगाव : प्रतिनिधी**

सहकार क्षेत्रात रायगड जिल्ह्यात अग्रगण्य असणाऱ्या माणगाव शहरातील माणगाव ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या.,उतेखोल ता.माणगाव या पतसंस्थेचा रौप्य महोत्सवी वर्धापन दिन सोहळा शनिवारी (दि.१) संस्था कार्यालय चौधरी कॉम्प्लेक्स माणगाव याठिकाणी उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थेतर्फे आयोजित करण्यात आलेल्या हळदी-कुंकू कार्यक्रमास हजारोंच्या संख्येने महिलांनी उपस्थित राहून हळदी-कुंकू समारंभाचा आनंद लुटला. माणगाव ग्रामीण पतसंस्थेत दरवर्षी उत्साहात वर्धापन दिन साजरा केला जातो. वर्धापनदिनानिमित्त



सत्यनारायणाची महापूजा संस्थेतर्फे आयोजित करण्यात आली होती तसेच महिलांसाठी हळदी-कुंकू समारंभ आयोजित करण्यात आला होता.

या हळदी-कुंकू समारंभात हजारोंच्या संख्येने महिला सहभागी झाल्या होत्या. हळदी-कुंकू समारंभास महिलांची रांगच रांग लागली होती. सत्यनारायणाच्या महापूजेलाही नागरिकांची मोठी गर्दी होती. संस्थेच्या भागधारक, खातेदार, हितचिंतक व मित्रपरिवार यांच्यासह माणगावकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहत तीर्थप्रसादाचा लाभ घेतला. संस्थेचे चेअरमन आनंद यादव व सहकाऱ्यांनी आलेल्या सर्व मान्यवरांचे स्वागत केले.

या वर्धापन दिनाचा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी संस्थेचे चेअरमन आनंदशेठ यादव, व्हाईस चेअरमन मदनलाल जैन सर्व संचालक मंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली पतसंस्थेचे व्यवस्थापक पुंडलिक गायकवाड, सर्व कर्मचारी वृंद व स्वल्पबचत प्रतिनिधी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांना दंड

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यात पर्यटनस्थळे जास्त प्रमाणात असल्याने येथे पर्यटक अधिक संख्येने येत असतात. त्याचा वाहतूकीवरही परिणाम होतो. त्यामुळे वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करून बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्या वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे.

जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शनिवारी (दि.१) वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण ३२९ वाहनचालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. पोलिसांनी या वाहनचालकांकडून तीन लाख आठ हजार ७०० रुपये इतका दंड आकारला आहे.

# हळदीकुंकू समारंभातून विचारांची देवाणघेवाण -डॉ. वैशाली पाटील

**पेण : प्रतिनिधी**

संक्रांतीचे हळदी कुंकू हा सामाजिक ऐक्याचा व विचारांच्या देवाण घेवाणीचा समारंभ बनत आहे. यानिमित्ताने सर्व स्थितीतील एकलं महिलांनाही सहभागी करणे ही काळाची गरज आहे असे प्रतिपादन जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या डॉ. वैशाली पाटील यांनी केले त्या अंकूर ट्रस्टने आयोजित केलेल्या आदिवासी महिला मेळाव्यात बोलत होत्या.

या कार्यक्रमास मीना मपारा, डॉ. मैत्रेयी पाटील, डॉ.अंकिता महाजन, लता गायकवाड, शैला धामणकर, अॅड.वैशाली कांबळे आदी उपस्थित होते.

या वेळेस डॉ. अंकिता महाजन यांनी वेगवेगळ्या त्वचा रोगाचे मूळ कारण सांगून उपाय योजनेविषयी मार्गदर्शन केले. तर भुलतज्ञ डॉ. मैत्रेयी पाटील यांनी आदिवासी महिलांच्या कुपोषणाच्या कारण मिमांसा करून महिलांची आरोग्य तपासणी केली. या कार्यक्रमात विविध २० आदिवासी वस्त्यामधील माहिला उपस्थित होत्या. या वेळेस लता गायकवाड, अॅड. वैशाली कांबळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.



# एकट्या अभिषेकने इंग्लंडला हरवले

**मुंबई : प्रतिनिधी**

अभिषेक शर्माच्या शतकाच्या जोरावर भारताने रविवारी पाचव्या व अंतिम टी-२० सामन्यात इंग्लंडवर १५० धावांनी मोठा विजय नोंदवला. अभिषेकने या सामन्यात १३५ धावांची धुवांधार खेळी केली. तो फक्त शतक झळकावून थांबला नाही, तर त्याने एकाच षटकात दोन विकेट्स घेत विक्रम केला. दुसरीकडे मोहम्मद शमीने तीन विकेट्स घेत आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये दणक्यात पुनरागमन केले आहे.




भारताने दिलेल्या २४८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना इंग्लंडचा संघ अवघ्या ९७ धावांवर सर्वबाद झाला. भारताकडून एकट्या अभिषेक शर्माने १३५ धावांची वादळी खेळी केली. इंग्लंडचे ११ खेळाडूही १३५ धावांचा टप्पा गाठू शकला नाही आणि हा संघ १०० धावांच्या आतच सर्वबाद झाला. मालिका आधीच काबीज केलेल्या टीम इंडियाने शेवटच्या सामन्यात इंग्लंडचा एकतर्फी १५० धावांच्या मोठ्या फरकाने पराभव केला. इंग्लंडचा धावांच्या बाबतीत हा सर्वात वाईट पराभव आहे.

भारताने नाणेफेक गमावल्यानंतर प्रथम फलंदाजी करण्यासाठी उतरला आणि पहिल्याच चेंडूपासून तुफानी फटकेबाजी करण्यास सुरूवात केली. संजू सॅमसनने पहिल्याच षटकात १६ धावा केल्या, पण पुढच्याच षटकात तो बाद झाला. अशा वेळी अभिषेक शर्माने दुसऱ्या बाजूने आक्रमण सुरूच ठेवत आपली तुफानी फटकेबाजी सुरूच ठेवली. त्याने विशेषत: जोफ्रा आर्चर आणि जेमी ओव्हरटन यांच्याविरूद्ध जोरदार फटकेबाजी केली आणि पॉवरप्लेमध्ये अवघ्या १७ चेंडूत आपले अर्धशतक पूर्ण केले. या फॉरमॅटमध्ये भारताचे हे दुसरे सर्वात वेगवान अर्धशतक आहे. टीम इंडियाने पहिल्या सहा षटकात ९५ धावा केल्या होत्या. अभिषेकची वादळी फलंदाजी सुरूच होती आणि त्याने ११व्या षटकात ३७ चेंडूत शतक पूर्ण केले. रोहित शर्मानंतर अभिषेक शर्माने भारतासाठी दुसरे सर्वात जलद शतक झळकावले.

### एक सामना, अनेक विक्रम!

टीम इंडियासाठी अभिषेक शर्मा या सामन्यात स्टार खेळाडू ठरला. त्याने अनेक मोठे विक्रम आपल्या नावे केले आहेत. अभिषेकने अवघ्या ३७ चेंडूत आपले शतक पूर्ण करत रोहित शर्मानंतर भारतासाठी दुसरे सर्वात जलद शतक करण्याचा विक्रम केला. पॉवरप्लेमध्येच अभिषेकने ५८ धावा केल्या होत्या. त्याने यशस्वी जैस्वालचा विक्रम मोडला. यापूर्वी जैस्वालने २०२३मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या टी-२० सामन्याच्या पॉवरप्लेमध्ये ५३ धावा केल्या होत्या. अभिषेकने १३५ धावांसह एका टी-२० सामन्यात भारतीय संघासाठी सर्वात मोठी खेळी खेळणारा फलंदाज बनला आहे आणि त्याने शुबमन गिलचा विक्रम मोडला. गिलने २०२३मध्ये न्यूझीलंडविरुद्ध १२६ धावांची इनिंग खेळली होती. अभिषेकने १३ षटकार लगावले. यापूर्वी रोहितने टी-२० डावात सर्वाधिक १० षटकार लगावले होते.

इंग्लंडने २४८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना चांगली सुरुवात केली आणि पहिल्याच षटकात फिल सॉल्टने मोहम्मद शमीविरूद्ध दोन चौकार आणि एक षटकारासह वादळी सुरुवात केली, मात्र पण त्याला दुसऱ्या बाजूने चांगली साथ मिळाली नाही. तिसऱ्या षटकात बेन डकेटला शमीने पहिल्याच चेंडूवर माघारी धाडले, तर पाचव्या षटकातच कर्णधार जोस बटलरला वरुण चक्रवर्तीने बाद केले. सॉल्ट दुसऱ्या बाजूने फटकेबाजी करत होताच आणि त्याने २१ चेंडूत अर्धशतकही ठोकले, मात्र बाकीचे फलंदाज शरणागती पत्करताना दिसले.

आठव्या षटकात शिवम दुबेने सॉल्टला (५५) बाद करून इंग्लंडच्या आशा धुळीस मिळवल्या. यानंतर अभिषेकने एकाच षटकात दोन विकेट घेत इंग्लंडच्या पराभवावर शिक्कामोर्तब केले. मग शमीने ११व्या षटकात सलग दोन विकेट घेत इंग्लंडला पराभूत केले. टीम इंडियाकडून शमीने सर्वाधिक तीन विकेट घेतल्या, तर दुबे, अभिषेक आणि वरुणने प्रत्येकी दोन विकेट घेतले. अशा प्रकारे टीम इंडियाने मालिका ४-१ने आपल्या नावे केली आहे.

## कुस्तीपटू शिवराज राक्षे, महेंद्र गायकवाड तीन वर्षांसाठी निलंबित

### महाराष्ट्र कुस्तीगीर परिषदेची मोठी कारवाई

**पुणे : प्रतिनिधी**

अहिल्यानगरमध्ये रविवारी महाराष्ट्र केसरी स्पर्धेची उपांत्य व अंतिम फेरी पार पडली. पुण्याचा पैलवान पृथ्वीराज मोहोळ याने अंतिम सामन्यात महेंद्र गायकवाडवर मात करत महाराष्ट्र केसरी स्पर्धेची गदा पटकावली. दरम्यान, अंतिम सामन्यात पंचांबरोबर वाद घातल्यामुळे महाराष्ट्र कुस्तीगीर परिषदेने महेंद्रवर तीन वर्षांसाठी निलंबनाची कारवाई केली आहे, तर उपांत्य फेरीत शिवराज राक्षे याने पंचाशी हुज्जत घालत त्यांना लाथ मारली. त्यामुळे त्यालाही तीन वर्षांसाठी निलंबित करण्यात आले आहे.

महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेच्या उपांत्य सामन्यावेळी मोठा गोंधळ पाहायला मिळाला. या सामान्यात अवघ्या ४० सेकंदात पृथ्वीराजने शिवराजला आपटले. त्यानंतर पचांनी पृथ्वीराजला विजयी घोषित केले, मात्र शिवराजने, त्याच्या प्रशिक्षकांनी व इतर उपस्थितांनी दावा केला की शिवराजचे दोन्ही





खांदे जमिनीला टेकलेच नव्हते. शिवराजने रिव्ह्यूचीही मागणी केली, मात्र पचांनी त्याच्या मागणीकडे दुर्लक्ष केले. परिणामी शिवराजने गोंधळ घातला.

दरम्यान, मैदानात धक्काबुक्कीही सुरू झाली. तब्बल अर्धा तास हा गोंधळ चालू होता. शिवराजने संतापून पंचांना लाथदेखील मारली. अर्ध्या तासाने स्पर्धेचा अंतिम सामना खेळवण्यात आला. या सामन्यात महेंद्र गायकवाड व पृथ्वीराज मोहोळ आमनेसामने होते, मात्र हाफ टाइममध्ये महेंद्रने पंचाशी वाद घालायला सुरुवात केली. त्याने पंचांना शिवीगाळ केल्याचा दावा केला जात आहे. त्यापाठोपाठ महेंद्रने थेट मैदान सोडले. त्यामुळे पंचांनी पृथ्वीराजला विजयी घोषित केले.

## रायगड जिल्हास्तरीय शालेय पॉवरलिफ्टिंग स्पर्धा उत्साहात






**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत रायगड जिल्हास्तरीय शालेय पॉवरलिफ्टिंग स्पर्धा नुकतीच कर्जत येथे झाली. रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या सौजन्याने पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशनने आयोजिलेल्या या स्पर्धेस खेळाडूंचा प्रतिसाद लाभला.

स्पर्धा कर्जतजवळील किरवली येथील श्री कालभैरव माध्यमिक स्कूल येथे झाली. स्पर्धेच्या उद्घाटन समारंभाला विद्यालयाचे सावळाराम बडेकर, विश्वनाथ बडेकर, पोलीस पाटील विवेक बडेकर, गजानन थोरवे, योगेश बडेकर, विकास बडेकर, संदीप ठाकरे आदी उपस्थित होते.

या स्पर्धेच्या १७ वर्षाखालील मुलांच्या गटात कर्जतचा गुरुप्रीत उमाशंकर प्रसाद हा स्ट्राँग मॅन, तर मुलींमध्ये कर्जतच्याच ऑर्चिड कॉलेजची गायत्री महेश बडेकर स्ट्राँग वूमन किताबाची मानकरी ठरली. १९ वर्षाखालील मुलांमध्ये अभिनव ज्ञानमंदिर कनिष्ठ महाविद्यालय कर्जतचा कुशल रवींद्र घारे स्ट्राँग मॅन, तर मुलींमध्ये याच महाविद्यालयाची अचल नवीन राजभर स्ट्राँग वूमन झाली. या विजेत्यांना श्री कालभैरव माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक राजेंद्र बोराडे व इतर मान्यवरांच्या हस्ते चषक देऊन गौरविण्यात आले. या वेळी तुषार मिसाळ, विजय लाड, मुकुटराव सातपुते आदी उपस्थित होते.

स्पर्धेत एकूण १९ मुले-मुली सहभागी झाले होते. स्पर्धेसाठी पंच म्हणून गोपीनाथ पवार (मुंबई), सुरेश धुळप (मुंबई), अरुण पाटकर (पनवेल-रायगड) यांनी जबाबदारी पार पडली. निवेदक म्हणून नवनाथ दाभाडे, निकालाचे काम पॉवरलिफ्टिंग रायगडचे सहसचिव सचिन भालेराव तसेच इतर व्यवस्था सुभाष टेंबे यांनी पाहिली.

या स्पर्धेची एकंदर व्यवस्था राष्ट्रीय वेटलिफ्टिंग आणि पॉवरलिफ्टिंग खेळाडू हनुमंत खरात आणि त्यांच्या टीममधील खेळाडूंनी केली होती. शालेय जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी क्रीडा अधिकारी अंकिता मयेकर यांचेसुद्धा मोलाचे सहकार्य झाले. स्पर्धेची प्राथमिक तयारी पॉवरलिफ्टिंगचे ज्येष्ठ खेळाडू माधव पंडित यांनी केली होती.

**गटनिहाय निकाल**

१७ वर्षाखालील मुले : ५३ किलो वजनी गट-गुरूप्रीत उमाशंकर प्रसाद (महिला मंदिर स्कूल, कर्जत) प्रथम, दीपक समीर जानकर (अभिनव ज्ञानमंदिर कर्जत) द्वितीय, ५९ किलो वजनी गट-जाहिद जहूर काणेकर (श्री छत्रपती माध्यमिक विद्यालय, वरंध, महाड) प्रथम, ६६ किलो वजनी गट-साईराज गुरूनाथ पालकर (शारदा मंदिर, कर्जत) प्रथम, ७४ किलो वजनी गट-ओमचैतन्य पवनकुमार गोसावी (अभिनव, कर्जत) प्रथम, ८३ किलो वजनी गट-राज योगेश कडू (अभिनव, कर्जत) प्रथम, अनुराग प्रमोद कुमार यादव (पीइएस पेण) द्वितीय; १७ वर्षातील मुली : ४३ किलो वजनी गट-गायत्री महेश बडेकर (ऑर्चिड कॉलेज, कर्जत) प्रथम, ४७ किलो वजनी गट-जानवी चंद्रकांत थोरवे (केईएस, कर्जत) प्रथम, ५७ किलो वजनी गट-आर्या मनोहर शिंदे (शारदा मंदिर, कर्जत) प्रथम, ६९ किलो वजनी गट-लावण्या प्रवीण भगत (आरसीएफ कुरूळ-अलिबाग) प्रथम; १९ वर्षाखालील मुले : ५३ किलो वजनी गट-संदेश बबन खरात (अभिनव, कर्जत) प्रथम, ५९ किलो वजनी गट-अनिरुद्ध अमित देशक (शारदा मंदिर, कर्जत) प्रथम, ६६ किलो वजनी गट-रिजवान इरफान खलिफा (अभिनव, कर्जत) प्रथम, ७४ किलो वजनी गट-खुशाल रवींद्र घारे (अभिनव, कर्जत) प्रथम, ८३ किलो वजनी गट-दीक्षांत संदीप गायकवाड (गजानन विद्या मंदिर, कडाव) प्रथम.

## भारतीय मुलींचा विश्वविजेता संघ मालामाल!

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

**बीसीसीआयने जाहीर केले कोट्यवधींचे बक्षीस**

भारताच्या अंडर-१९ महिला क्रिकेट संघाने टी-२० विश्वचषक जिंकून इतिहास घडवला. कर्णधार निक्की प्रसादच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने रविवारी अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा नऊ गडी राखून सहज पराभव केला. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) विश्वविजेत्या संघाला कोट्यवधीचे बक्षीस जाहीर केले आहे.

भारतीय क्रिकेट बोर्डाने टीम इंडियाच्या विजयाचा आनंद व्यक्त करत देशाला गौरव मिळवून देणाऱ्या खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. यानंतर बीसीसीआयने सोशल मीडिया पोस्टमध्ये खेळाडूंच्या यशाचा उल्लेख करत पाच कोटी रुपयांचे बक्षीस जाहीर केले. संघातील सर्व १५ खेळाडू, मुख्य प्रशिक्षक नूशीन अल खदीर आणि सपोर्ट स्टाफमधील इतर सदस्यांमध्ये हे बक्षीस वितरित केले जाईल.




## रायगड तायक्वांडो असोसिएशनतर्फे बेल्ट परीक्षा उत्तीर्ण, आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा गौरव

### आमदार प्रशांत ठाकूर यांचा विशेष सत्कार






**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड तायक्वांडो असोसिएशनच्या वतीने बेल्ट परीक्षेत यश मिळविणाऱ्या तसेच आंतरराष्ट्रीय खेळाडूंना आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते रविवारी (दि.२) गौरविण्यात आले, तर विधानसभा निवडणुकीत सलग चौथ्यांदा विजयी झाल्याबद्दल आमदार प्रशांत ठाकूर यांचा या वेळी विशेष सत्कार करण्यात आला.

खांदा कॉलनीतील न्यू होरायजन पब्लिक स्कूलमध्ये झालेल्या या कार्यक्रमाला विधान परिषदेचे आमदार विक्रांत पाटील, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्यासह खारघरमधील संजीवनी इंटरनॅशनल स्कूलच्या प्राचार्य डॉ. अनुराग पांडे, उलवे नोडमधील एसएनजी इंटरनॅशनल स्कूलच्या प्राचार्य डेबलिन रॉय आदी उपस्थित होते. मान्यवरांना सन्मानित करण्यात आले.

सुभाष पाटील यांना कोरियामध्ये इंटरनॅशनल अवॉर्ड मिळाल्याबद्दल त्यांचा माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते या वेळी सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला जवळपास दोन हजार खेळाडू व पालक उपस्थित होते.



## उरणची बुद्धिबळपटू आराध्याकडून बक्षिसांचे शतक

**उरण** : येथील नऊ वर्षीय आराध्या विनोद पुरो हिने गेल्या दोन वर्षांत झालेल्या विविध बुद्धिबळ स्पर्धांमध्ये मिळून बक्षिसांचे शतक गाठले आहे. आराध्या ही उरण एज्युकेशन सोसायटी या शैक्षणिक संस्थेत इयत्ता तिसरी इयत्तेमध्ये शिकत असून नुकतेच ठाणे कोरम मोल येथे झालेल्या जिल्हास्तरीय स्पर्धेत सहभाग घेत प्रथम क्रमांक पटकावला. याबद्दल तिचा सत्कार करण्यात आला. या वेळी आराध्याचे प्रशिक्षक संदीप पाटील, उरण सामाजिक संस्थेचे सरचिटणीस संतोष पवार, माजी नगराध्यक्ष गणेश शिंदे, माजी नगरसेवक अतुल ठाकूर, समीर मुकरी, पत्रकार घनःश्याम कडू, विरेश मोडखरकर, उद्योजक सुरेश ठाकूर, प्रा. निरंतर सावंत, सामाजिक कार्यकर्त्या लता पानसरे आदी उपस्थित होते.





**पनवेल : तक्का येथे मंगलमूर्ती क्रिकेट संघाच्या वतीने नगरसेवक चषक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेला भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, ओबीसी सेल जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे यांनी भेट दिली. या वेळी माजी नगरसेवक अजय बहिरा, सुरेश बहिरा, प्रमोद बहिरा, प्रशांत बहिरा, प्रशांत पाटील, जितू कुटकर, राजू दवे उपस्थित होते.**








दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com